# इब्सेन–

(... परिचय)

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
...नं. ४३९

इब्सेन

REFBK-0005994

किंमत १० आणे

—ग. भा. निरंतर
M. A.

सं. ता.

सं. नं.
ता.
ठाणे.

4 AUG 1985

मनोहर ग्रंथमाला पुष्प १[illegible]वें

# इब्सेन—

( व्यक्ति व वाङ्मय )

नोंद नं ५८८२

ठाणे

REFBK-0005994

—गं. भा. निरंतर
M. A.

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथ माला
१९६।८५ टिळकरोड, पुणें २.

मुद्रक :
लक्ष्मण सखाराम केळकर
जनार्दन सदाशिव लिमिटेड, प्रेस
३९४ सदाशिव पेठ, पुणें २.

आचार्य

प्र. के. अत्रे

यांस—

# निवेदन

—*—

माझ्या हौशीच्या लेखनास सुरवात या लेखांनीं झाली. ९।१० वर्षांपूर्वीं ‘ प्रगति ’ साप्ताहिकांत हे लेख प्रसिद्ध झाले आहेत. प्रगतीचे संपादक प्रा. शेजवलकर यांनीं हें लेखन प्रगतीसाठीं स्वीकारलें याबद्दल मी त्यांचे या ठिकाणीं पहिल्यानेंच आभार मानतो.

इब्सेनचें लेखन मला अतिशय आवडतें. मी हे लेख ८।१० वर्षांपूर्वीं लिहिले असले तरी मला ते वाचण्याचा कधींही कंटाळा येत नाहीं. माझ्या मित्रांनाहि तसेंच वाटलें आणि त्यांच्या प्रोत्साहनानेंच मी हे लेख एकत्रित स्वरूपांत वाचकांपुढें ठेवीत आहे.

अर्पण पत्रिकेची योजना माझ्या मनाची आहे. त्यांत आचार्य अत्रे यांच्या अनुमतीचा संबंध नाहीं. त्यांना काय वाटेल हें व्यक्त करण्यास ते स्वतंत्र आहेतच.

माझे मित्र श्री. गोपीनाथ तळवलकर यांचे आभार मानणें आत्मस्तुतीसारखें होणार आहे.

श्री. मनोहर केळकर, श्री. ढमढेरे व श्री. लखजी आंबराईकर यांचे आभार कसे मानावेत हें मला अद्याप ठरवितां आलें नाहीं.

पुणें
२१।१।१९४०

—गं. भा. निरंतर

# परिचय

मित्रवर्य प्रा. गंगाधर भाऊराव निरंतर यांचें हें पुस्तक लहान पण वैशिष्ट्यपूर्ण आहे. ‘ प्रगति ’ या अल्पायु पण अत्यंत तेजस्वी ठरलेल्या साप्ताहिकांत ‘ इब्सेन ’ वरील ही श्री. निरंतरांची लेख-माला प्रथम प्रसिद्ध झाली, ह्या लेखमालेचें त्यावेळीं चांगलें स्वागत झालें आणि पुरोगामी लेखकांत प्रा. निरंतर यांची गणना होऊं लागली. या लेखमालेनें प्रा. निरंतर यांच्याबद्दल वाचकवर्गाच्या मनांत उत्पन्न झालेल्या आशा–आकांक्षा फोल ठरल्या नाहींत हें गेल्या दशकांतील प्रा. निरंतरांच्या सुरस लिखाणावरून कोणासहि कळून येईल. आपल्या वाङ्मयसेवेच्या उगमाकडे वाचकांना पुनश्च एकवार नेऊन प्रा. निरंतर यांनीं आत्मपरिक्षणाची संधि तर साधलीच पण आपल्या महान् स्फूर्तिदात्याच्या जीविताचें व वाङ्मयकार्याचें पुण्यस्मरण वाचकांना करून दिलें याबद्दल कुणीहि झालें तरी त्यांचे आभारच मानील.

‘ इब्सेन ’ वरील प्रा. निरंतर यांची भक्ति फॅशनेबल स्वरूपाची कधींच नव्हती. आध्यात्मिक, काव्यात्मक अशा वाङ्मयसंपदेच्या राशींत संचार करूनहि, चुकीच्या परिचय पद्धतीमुळें म्हणा, किंवा वास्तव जगांतल्या कठोरपणाचें दर्शन फार भडक झालें म्हणून म्हणा, अथवा मूळ वृत्तींतच बंडखोरीचीं बीजें असल्यानें म्हणा हा कॉलेज कुमार अंतर्यामीं असंतुष्ट व बावरलेला होता. अशा स्थितींत इब्सेन हातीं येतांच त्यास एकदम दिलासा वाटला, स्फूर्ति आली, नवीन दृष्टि लाभली यांत काय नवल ? श्री. निरंतर यांचें इब्सेनवरील प्रेम केवळ बौद्धिक अथवा पंडिती वळणाचें नाहीं. तें पढिक वेदोनारायणाचें धर्मप्रेमासारखें नाहीं, तर विवेकानंद, रामकृष्णादि संतांच्या भक्तीसारखें उत्कट, श्रद्धामय आहे. श्री. निरंतर यांना जाहिरातीचें तंत्र विशेष अवगत असतें किंवा इब्सेन-

विषयीं त्यांना जरा कमी जिव्हाळा वाटला असतां, तर **निरंतर = इब्सेन** हें समीकरण त्यांनीं महाराष्ट्रांत रूढ केलें असतें! इतका त्यांचा इब्सेन याविषयीं अभ्यास आहे. पण इब्सेनवरील त्यांची भक्ति इतकी बावनकशी आहे कीं, तिचें प्रदर्शन त्यांना कधींच करावेंसें वाटलें नाहीं. आपल्या जीवनांत आणि वाङ्मयांत 'इब्सेनिझम्' चीं तत्त्वें बाणविण्यांतच त्यांना आपल्या भक्तीची सार्थकता वाटली.

इब्सेनची महान् योग्यता प्रस्तुत पुस्तकावरून वाचकांना यथार्थतेनें कळून येईल. तेव्हां प्रस्तावनाकाराचा डौल सांभाळण्याकरितां ती पुनःश्च विशद करण्याच्या उपद्व्यापांत मी पडत नाहीं. युरोपांत मानवी संस्कृतीच्या विचारधनांत अत्यंत क्रांतिकारक भर घालणारे जे महर्षी गेल्या दीड-दोन शतकांत झाले त्यांत इब्सेनचें स्थान वरचें आहे. मनुष्याच्या उन्नतीच्या पायऱ्या ठरविण्यास भौतिक साधनें हींच प्रभावी ठरतात, हें तत्त्व इतिहासाला लावून कार्ल मार्क्सनें जागतिक घडामोडींची एक अभिनव संगति लाविली. जग आणि त्याचे व्यापक हे सान्त व सापेक्ष आहेत असें सिद्ध करून आइन्टाइननें विज्ञानशास्त्रांत क्रांति केली, आणि अंतर्मनाच्या हालचालींचें संशोधन करून फ्राइडनें मानसशास्त्रांतले अज्ञात प्रांत शोधून काढले. याच पद्धतीचें कार्य वाङ्मयाच्या क्षेत्रांत इब्सेननें केलें.

वरील सर्व विचाराग्रणी हे भौतिकवादी आहेत. भौतिकवादाला ( Materialism ) लाच आतां पदार्थ विज्ञानवादी वास्तवता ( Physical Realism ) असें विशेष अन्वर्थक नांव एका जगविख्यात क्रांतिकारानें दिलें आहे. आणि इब्सेनची तत्त्वप्रणाली कळण्यास या नांवाचा विशेष उपयोग होणार आहे. समाजांतील पिढ्यान्पिढ्यांच्या संकेतांची व मूल्यांची खरी योग्यता वस्तुनिष्ठ ( Objective ) दृष्टीनें इब्सेननें जगाला दाखविली हेंच त्याचें

महत्कार्य. ज्या चालीरीतींच्या, निष्ठांच्या पाठीशीं असलेलें सत्य अथवा उपयुक्तता हीं कधींच उडून गेलीं आहेत, पण परंपराभिमान्यांच्या सोईसाठीं ज्यांचें अस्तित्व टिकवावें लागत आहे त्या चालीरीतींवर व निष्ठांवर इब्सेननें घाव घातला. आणि वैचारिक जगांत मोठें बंड उभारलें. इब्सेनची नोरा 'घरकुल' सोडून गेली तेव्हां तिनें लोटलेल्या दाराची करकर युरोपियन वाङ्मयांत कितीकाळ तरी निनादत राहिली असें टीकाकार म्हणतात. आणि मराठीं वाङ्मयांतहि या करकरण्याचे बरेवाईट पडसाद आज उठत आहेत. खुद्द श्री. निरंतर यांचे 'जीवननृत्य' किंवा 'अंधारांतील दिवे' ह्या कादंबऱ्या हीं या पडसादाची उत्कृष्ट उदाहरणें नव्हेत काय ?

"To be a poet is to be an absolute master of once own age."

हे इब्सेनचे उद्गार त्याच्याइतके कोणाला समर्पक लागूं पडतील ? अर्थात् जगांतील वाङ्मयांत इतकें प्रभुत्व मिळवितांना इब्सेनच्या वांट्याला कांटेरी मुकुट आला हें साहजिकच होतें. सुंदर पक्ष्याला बाणानें विध्य करून खालीं पाडावयाचें आणि मग त्याच्या मनोरम पिसांनीं आपला देह व गेह अलंकृत करावयाचें अशी प्रतिभाशाली माणसांना वागविण्याची जनरीत बर्नार्ड शॉनीं 'सेंट जोन'च्या प्रस्तावनेंत वर्णिली आहे. बिचारा इब्सेन तर या रीतीला अपवाद कुठला सांपडायला ? त्याला आपले जीवन हाल अपेष्टांत काढण्याची पाळी आली. प्रा. निरंतर यांनीं हा जीवनवृत्तांत अत्यंत सहाय्यतेनें रंगविला आहे. पुढील वाङ्मयचर्चेला ह्या व्यक्तिवर्णनाच्या विभागाची पार्श्वभूमि फारच मदत करते.

आवडत्या विषयावर लिहावयाचें असल्यानें श्री. निरंतर निःसंकोचपणें व उत्साहानें वाक्यें टाकीत आहेत असें वाटतें. त्यांच्या भाषेंत अपरंपारिक आणि पल्लेदार अशी रचना आढळून मौज

वाटते. नेहमींची उपरोधप्रियता किंवा विरोधा भासाची आवड या पुस्तकांत फार थोडी दिसते यावरून प्रस्तुत विषयासंबंधीं त्यांची तळमळ किती आहे हें कळते.

प्रि. प्रल्हाद केशव अत्रे यांना हें पुस्तक अर्पण करण्यांत श्री. निरंतर यांनीं केवळ खाजगी स्नेहाचेच प्रकटीकरण केलें, असें नाहीं तर सार्वजनिक कर्तव्याचें औचित्यहि पाळलें आहे. मराठी रंगभूमीच्या पडत्या काळांत आपल्या चटकदार व प्रगतिपर नाट्य-कृतींनीं नाट्यकलेची परंपरा प्रि. अत्रे यांनीं अखंड राखली. 'इब्सेन' वर लिहिलेलें हें पुस्तक असल्या प्रभावशाली नाटक-कारास अर्पण करणेंच उचित नाहीं का ?

प्रा. निरंतर यांच्या या पुस्तकाचें स्वागत मराठी वाचकवर्ग व विद्यार्थी उत्साहानें करतील यांत मला शंका वाटत नाहीं. श्री. निरंतर व मी यांचे गाढ स्नेहसंबंध विश्रुत आहेत. तेव्हां प्रस्तावना लेखनाची संधि दिल्याबद्दल आभार मानणें आणि त्यांच्या भावी वाङ्मयकार्याबद्दल आशाप्रदर्शन करणें वगैरे उपचार फारच कृत्रिम व हास्यास्पद ठरतील. तेव्हां त्या भानगडींत मी पडत नाहीं.

परांजपे सदन, टिळकरोड,
पुणें.
— गोपिनाथ तळवलकर.

# चरित्र परिचय : : : १

या नार्वेजियन ‘आगरकराचा’ जन्म २० मार्च १८२८ साली झाला. इब्सेनच्या जन्माला १०० वर्षें होऊन गेलीं तरी अद्याप त्यानें आपल्या तीव्र टीकेचे समाजावर केलेले प्रहार अगदीं ताजे आहेत असे वाटतात. इब्सेनच्या जीवितहेतुबद्दल आतां फारसे मतभेद उरले नाहींत. इब्सेनचें घराणें अगदीं सामान्य दर्जाचें होतें. इब्सेनला आपल्या इब्सेनिझमच्या वैभवासाठीं वाडवडिलांकडून मुळींच फंड मिळाला नाहीं. इब्सेनचें व्यक्तित्व असें स्वयंसिद्ध आहे. असामान्य माणसें बीजांकुरन्यायाचा वंशशास्त्राचा नियम जबरदस्त विरोधानें सपशेल खोटा ठरवितात. मोठ्यांचीं मुलें नेमकीं मोठीं निघतीलच किंवा मोठीं माणसें मोठ्या कुलांतच जन्माला येतील

असें विधान बरेचसें मर्यादित क्षेत्रांतच खरें ठरतें. कोणचेंही कुल असो, आईबाप कोणीही असोत, परिस्थिति कशीही असो, विभूतींच्या जन्मासाठीं या बाह्य उपाधींच्या सजावटीची मुळींच जरूर नसते. किंबहुना श्रीकृष्णानें गीतेंत म्हटल्याप्रमाणें या सर्व गोष्टी निमित्त-मात्र असतात. लौकिक दृष्टि थोडा वेळ बाजूस ठेवली तर आपणास असें दिसून येईल कीं, जगांत नांवारूपास आलेलीं माणसें हीं स्वयंसिद्धच होतीं. तीं झालीं तशीं होण्यासाठींच जन्माला आलीं होतीं. इब्सेनचे आजोबा 'हेन्री' आपल्या स्वतःच्याच जहाजांत बुडून रसातळास गेले होते. परंतु सुदैवानें जहाजाबरोबर बुडालेल्या सर्व माणसांत इब्सेनचे वडील पीटर इब्सेन हे नव्हते !

स्कीन ( नार्वे ) येथें इब्सेनचा जन्म झाला, त्यावेळीं स्कीन गांव अगदींच भिकार होतें. परंतु लोकवस्तीस अनुकूल व उत्तेजक असेंच त्या गांवचें वातावरण होतें. वास्तुशास्त्राच्या दृष्टीनें स्कीनचें वैभव त्या काळीं अगदींच क्षुद्र होतें तरी तेथें मोठमोठीं कुटुंबें शेतीवाडी करून रहात होतीं. इब्सेनच्या जन्मभूमीचा परिचय इब्सेननें आपल्या ब्रँड या नाटकांत रेखाटलेल्या वस्तुस्थितींत होतो. त्या गांवीं मोठ-मोठ्या यात्रा भरत व प्रवाशांची नेहमीं ये जा चालू असे. निर-निराळे खेळ खेळत व यात्रेच्या विविध करमणुकींत मनमुराद भाग घेत, इब्सेनचें बालपण चाललें होतें. सामान्य समाजापासून फटकून वागणारा असा श्रीमंत उमरावांचा वर्ग त्या गांवीं होता व त्याचेंच चित्र इब्सेननें आपल्या 'लीग ऑफ यूथ' या नाटकांत रंगवलें आहे. इब्सेनचें स्वतःचें घराणें त्या प्रतिष्ठित लोकांतच मोडत असे व वयाच्या आठ वर्षांपर्यंत इब्सेननें आपल्या कुटुंबाच्या ऐश्वर्यांत दिवस काढले. परंतु आठव्या वर्षी त्या कुटुंबाचे दिवस फिरले व

आठ वर्षांच्या हेन्रीच्या आयुष्यालासुद्धां सर्वांबरोबर कलाटणी मिळाली. यावेळीं आपल्या सावकाराच्या पायीं इब्सेनच्या वडिलांना घरादारास मुकावें लागलें. इतके दिवस ऐश्वर्यांत काढल्यावर आतां त्या कुटुंबाला एका लहानशा नापीक जमिनीच्या तुकड्याची मशागत करून अनत्नुभूत अशी काटकसर करून कसेंबसें पोट भरण्यास सुरवात करावी लागली. परिस्थितीच्या या विपरीत फेऱ्यामुळें सर्व कुटुंबावर औदासिन्याचें वातावरण पसरलें व हेन्री कुटुंबांतला सगळयांत वडील मुलगा असल्यामुळें त्याच्याही मनावर परिस्थितीचा परिणाम झाला. १८५० सालीं त्यानें लिहिलेल्या पहिल्या कवितांत या त्याच्या अकालीं गंभीर झालेल्या मनोवृत्तीचें दर्शन होतें. आपल्या भावंडाबरोबर इब्सेन आतां स्वच्छंदानें खेळेंनासा झाला. त्याच्या चार बहिणी व भाऊ अंगणांत खेळत असत त्यावेळीं इब्सेन सैंपाकघरासमोरच्या एका खोलींत एकटा बसत असे आणि आंतून दार लावून घेऊन तो तेथें एकांतांत तासचे तास बसून राही. आठ वर्षांच्या वयांत परिस्थितीचें पूर्ण आकलन होण्याइतका इब्सेन प्रौढ नव्हता खास. परंतु आपल्या भोंवतालीं कांहीं तरी भयंकर घडामोड झाली आहे आणि आपले खेळायचे दिवस संपले आहेत असें इब्सेनला कांहीं तरी अस्फुट वाटत असलें पाहिजे. वैभवाच्या सावलींतून एकदम दूर लोटले गेल्यामुळें आपल्या वडिलांवर पसरलेली उद्विग्नता इब्सेनला स्पष्ट दिसत होती.

वयाच्या १४ व्या वर्षी इब्सेन आपलें पोट भरण्यासाठीं गांवाबाहेर व घराबाहेर पडला. नार्वेच्या दक्षिण किनाऱ्यावर अगदीं एकाबाजूस असलेल्या ग्रिमस्टॅड गांवीं इब्सेन औषधें तयार करून रस्त्यानें 'वैदू' सारखा हिंडूं लागला. हें काम त्यानें पांच वर्षेंपर्यंत

केलें. वयाच्या १९ व्या वर्षी हा विश्ववेधक महापुरुष लोकांना औषधें पुरवून एक प्रकारें आपलें भावी उद्दिष्ट कार्यच करीत होता. समाजाच्या शारीरिक व्याधींची चिकित्सा व निदान करण्याचा त्याचा पोटार्थी व्यवसाय समाजाच्या मानसिक अभ्यासास पूरकच होता असें म्हणतां येईल. मॅथ्यू आर्नोल्ड गटेविषयीं लिहितांना म्हणतो तेच उद्गार इब्सेनलाही पर्यायानें लागू पडतात. हा औषध-विक्रयाचा धंदा करीत असतां इब्सेन समाजाच्या वाटेल त्या विभागांत भटकत असेल. नानारत्ना वसुंधरा त्यानें सांगोपांग पाहिली असेल व त्याच्या संस्कारक्षम अंतःकरणावर त्याचे चिरस्थायी संस्कार झाल्यावांचून राहिले नाहींत. मनुष्य जगांत वावरत असला म्हणजे त्याला कळत किंवा नकळत भोंवतालच्या जगाचे कांहींतरी थोडेफार संस्कार त्याच्यावर होतातच. डोळे उघडल्यावर आपल्या मनांतही नसलेल्या हजारों गोष्टी आपण पाहूं लागतों. बिंबग्रहणाचें कार्य नेत्राचें चालू असतें. या बिंबग्रहणाच्या क्रियेबरोबरच संवादी विचारांचें परावर्तनही अंतःकरणांतून तितक्याच नैसर्गिकपणें होत असतें. फोटोच्या निगेटिव्हप्रमाणें नुसते संस्कार होत नाहींत तर संस्कार-फलक हा सचेतन ( अंतःकरण ) असल्यामुळें त्या फलकाकडूनही कांहीं पडसाद उत्पन्न होतात. अशा रीतीनें जगांत विविध व्यवहार पाहून प्रत्येक व्यक्तीच्या मनांत कांहींतरी विचारप्रवाह सुरू होतातच. म्हणूनच सृष्टि ही शिक्षणाची शाळा आहे असें आपण म्हणतों. आयुष्याचीं पहिलीं वीस वर्षे सामान्य माणसाच्या आयुष्यांतसुद्धां किती महत्त्वाचीं असतात. एखाद्या व्यक्तीला जें आपलें विशिष्ट ध्येय गांठावयाचें असेल त्याची सामुग्री या काळांत जमवावयाची असते. प्रसिद्ध कवि या वयांत होमर वाचतांना आढळतात, विख्यात

नाटककार ग्रीक ट्रॅजेडींचीं पारायणें करतात. भावी समाजशास्त्रज्ञ प्राचीन समाजशास्त्रज्ञांच्या ग्रंथांचें अवलोकन करून आपल्या व्यक्तित्वासाठीं भूमिका शोधीत असतात. सामाजिक क्रांतिकारक इब्सेनही समाजशास्त्राचा अभ्यासच करीत होता. त्याच्या हातून आपोआपच हा अभ्यास होत होता. त्याच्या डोळ्यांसमोर समाजाचा चालता बोलता जिवंत ग्रंथ होता व मानवी आयुष्य या महत् ग्रंथाचीं एक एक पानें त्याच्या डोळ्यांसमोरून सरकत होतीं. परंतु हें सर्व अगदींच अज्ञातपणें होत नव्हतें. भोंवतालच्या जगाबद्दल थोडे फार स्वयंस्फूर्त विचार इब्सेनच्या मनांत डोकावूं लागले होते. मलमाच्या डब्या व औषधाच्या कुप्या भरीत असतां इब्सेनचें आयुष्याविषयींचें तत्त्वज्ञान तयार होत होतें. आयुष्याच्या प्रगतीला होणारा विरोध पाहून त्याचें असमाधान वाढत होतें. या धंद्यांतून आपणास कांहीं तरी वाट फोडली पाहिजे, जन्मभर बाटल्या विसळीत बसणें शक्यच नाहीं असा तो ठाम निश्चय करीत होता व एखाद्या सेनापतीप्रमाणें परिस्थितीची फळी फोडण्याचे त्याचे बेत आगाऊच चालले होते. परंतु या काळातील त्याची महत्त्वाकांक्षाही त्याच्या जीवनक्रमांतील वातावरणानेंच भारलेली होती व आपण वैद्यकशास्त्राचाच अभ्यास करून त्यांत प्राविण्य मिळवावे असे इब्सेनचे विचार असत. या काळांत आपलें उदयोन्मुख अंतःकरण कांहीं काव्य करून तो रिझवीत असे. यावेळी १८४८ व १८४९ सालच्या 'फेब्रुवारी क्रांती' चा स्फोट झाला व त्याबरोबरच त्या विचारप्रवाहांच्या लाटा दूरदूरच्या देशाच्या किनाऱ्यावरही जाऊन आदळल्या. इब्सेनच्या अंतःकरणावर त्या स्फूर्तिसंपन्न वातावरणाचे झालेले परिणाम तत्कालीन काव्यरचनेंतून दिसूं लागले. त्याचें काव्य

खरोखरच spontaneous overflow of powerful feelings असें दिसतें. अंतःकरणांत उसळणारे प्रबळ विचार आपोआप बाहेर पडतात त्यावेळीं जें काव्य निर्माण होतें त्यांत अंतःकरणाची खळबळ व्यक्त होते. याची साक्ष इब्सेनच्या त्या काळांतील काव्यांतून पटते. १८४९ सालीं आगष्ट महिन्यांत स्वातंत्र्याच्या झगड्यांत हंगेरीला पिछेहाट खावी लागली. त्या पराभूत हंगेरीला उद्देशून इब्सेननें स्फूर्तिदायक काव्य लिहिलें, व जर्मनी व डेन्मार्क यांच्यामधील युद्धप्रसंगावर त्यानें कांहीं सुनीतेंही लिहिलीं. हीं एकंदर १२ सुनीतें होतीं. व त्या सुनीतावलीच्या शिरोभागीं 'स्कॅंडिनेव्हियनांनो, उठा!' असें शीर्षक होतें. एका औषधविक्याच्या मुखांतून निघणारे हे वीरश्रीचे उद्गार ही समाजांत खळबळ उडविण्यास पुरेशी गोष्ट होती. जे विचार मनांतसुद्धां आणण्याची तत्कालीन समाजांतील शिष्टांनाही भीति वाटत होती, ते विचार या औषधविक्यानें शाहिरी थाटानें गाऊं लागावेत हें इब्सेनच्या भोंवतालच्या समाजांतील शिष्टांना रुचलें नाहीं. परंतु सामाजिक विरोधाला पुरून उरणारा दुर्दम आत्मविश्वास इब्सेनमध्येंही होता व त्याच्या जीवितयुद्धांतील पहिल्या चकमकी येथें सुरू झाल्या. स्वतःच्या व्यक्तित्वाचा डांगोरा पिटण्याचें काम इब्सेनच्या हातून झालें नाहीं. उलट व्यक्तित्वाची चाहूल लागूं न देतां समाजांत सहज मिसळून अज्ञात रहावें अशी इब्सेनची वृत्ति असे. परंतु तेंच जर विरोधाचें आव्हान आलें, जर आपल्या कर्तृत्वानें समाजांत भयंकर त्वेषाचें वातावरण उत्पन्न करून आपल्यावरील शिव्याशापांनीं व निंदकांच्या फूत्कारांनीं सर्वत्र त्याचा गाजावाजा व्हावा अशी इब्सेनच्या स्वभावाची दुसरी बाजू असे. अपरिहार्य

विरोधाला त्यानें कधीं तोंड फिरवलें नाहीं. परंतु त्याचबरोबर विरोध करण्याच्या हौसेनें त्यानें कधीं शिवराळपणाही केला नाहीं.

यावेळीं इब्सेननें आपल्या आयुष्याचें भवितव्य दाखविणारें एक पुस्तक वाचलें तें म्हणजे सॅलस्ट या ग्रंथकाराचें 'कॅटिलाइन' व त्याचबरोबर कॅटिलाइनवर भरपूर टीका करणारा सिसरोचाही ग्रंथ इब्सेननें वाचला. दोन्ही ग्रंथकारांच्या परस्परविरोधी मतांत कॅटिलाइनची सामान्य भूमिका इब्सेनला दिसली. कॅटिलाइन हा सामाजिक अन्यायानें चिडून जाऊन अस्वस्थ अंतःकरणानें व भावनाप्रधान स्वभावानें त्या अन्यायांना सुचेल त्या बऱ्यावाईट मार्गानें विरोध करणारा धाडसी पुरुष आहे हें इब्सेनला दिसलें. कॅटिलाइन ही कोणी एक बेफाम मनोवृत्तीची व्यक्ति आहे असें न वाटतां त्याच्या अस्थिर मनोवृतींत व्यक्त होणारी अन्यायाची चीड व निराकरणाची तळमळ इब्सेनला स्पष्ट कळली; परंतु तरीसुद्धां कॅटिलाइनला समाज सुधारणेचें कार्य करतां आलें नाहीं. कॅटिलाइन या भूमिकेबद्दल इब्सेनला इतका जिव्हाळा प्रथम परिचयांतच वाटला कीं, त्यानें त्याच नांवाचें स्वतः एक नाटक लिहिलें. हेंच त्याचें पहिलें नाटक. परंतु ग्रंथकर्त्याचें खरें नांव न देतां त्यानें टोपण नांव धारण केलें. औषधविक्याच्या दर्जावरून इब्सेननें सामाजिक विरोध उत्पन्न करून तो सहन करण्याचें व्यक्त केलेले हें धैर्य एकप्रकारें त्याच्या परिस्थितीचाही गुण आहे असें म्हणतां येईल. कादद्याच्या पुड्या बांधून कसेंबसें जीवन मिळवणाऱ्या व्यक्तीला समाज तेव्हांच चिरडून टाकील याची इब्सेनला भीति वाटली नाहीं. उलट जाणून बुजून आपण कनिष्ठ दर्जावर आहोंत, आपलें कोण काय वाईट करणार आहे ? नाहीं तरी सामाजिक इभ्रतीचा बडेजाव ठेवून

समाजानें कधीं माझ्याबद्दल कळकळ दाखविली आहे ?. मग निदान मनांत येतें तें मनमुरादपणें बोलून जरा खुल्या दिलानें तरी कां जगू नये अशी वृत्तिही जास्त संभवनीय आहे. 'नंगेकु खुदा डरता है'! याच दृष्टीनें इब्सेनचा सामाजिक दर्जा त्याच्या मतप्रदर्शनास पुष्कळसा सुरक्षित होता असें म्हणावें लागेल. 'कॅटिलाइन' हें इब्सेनचें नाटक प्रथम सगळीकडून परत आलें. कोणी तें प्रसिद्धहि करीना. शेवटीं १८५० त इब्सेनच्या एका मित्रानें ( Schuierud ) स्वत: तें प्रसिद्ध केलें. परंतु त्याच्या केवळ ३२ प्रती खपल्या व बाकीच्या प्रती एका दयाळू वाण्यानें पुड्या बांधण्यासाठीं कागद म्हणून उपयोगांत आणल्या ! इब्सेनखेरीज सर्वांना कॅटिलाइनचा विसर पडला परंतु इब्सेनला कॅटिलाइनचा अव्यक्त जिव्हाळा वाटत होता. २५ वर्षांनंतरसुद्धां त्याची सुधारून वाढविलेली आवृत्ति काढण्याविषयींचे विचार त्यानें २३ नोव्हेंबर १८७४ रोजीं हेगेलला लिहीलेल्या पत्रांत व्यक्त केले आहेत.

आपल्या मनांतील विश्वविद्यालयाच्या परिक्षेची महत्वाकांक्षा पुरी करण्यासाठीं इब्सेन नंतर क्रिश्चियाना येथे गेला, व तेथें लवकरच समाजांत त्यानें एक ग्रंथकार म्हणून जबाबदार स्थान मिळविलें. त्याच्या भोंवतीं त्याच्या सारख्याच क्रांतीकारक विचारांच्या तरुण मित्रांचा संघ असे व भोंवतालच्या शिष्टांची फारशी फिकीर न करतां हे युवक आपल्या विचारांचा संधि सांपडेल तेव्हां स्पष्ट उच्चार करीत असत. इब्सेनचें दुसरें नाटक 'वीराची समाधि' हें क्रिश्चियाना नाटकगृहाकडून स्वीकार करण्यांत आलें व त्या नाटकाच्या प्रयोगानंतर इब्सेनला आपल्या कर्तृत्वाबद्दल इतका आत्मविश्वास वाटूं लागला कीं, विश्वविद्यालयाचा अभ्यासक्रम सोडून तो क्रिश्चि-

याना येथेंच केवळ वाङ्मयसेवक म्हणून राहूं लागला. त्याच्या-बरोबर त्याचा वर उल्लेख केलेला मित्रही रहात असे. 'वीराची समाधी' या नाटकामुळें इब्सेनची कीर्ति वाढली तरी त्या हारतुऱ्यांत इब्सेनच्या भाकरीची सोय झाली नाहीं. इब्सेन आपल्या मित्राच्या कमाईवरच दिवस काढीत होता. परंतु पुढें पुढें त्यांना साधारण वऱ्यापैकीं जेवण मिळणेंही दुरापास्त झालें. आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्यांना आपण उपास करून दिवस काढतों हें कळूं नये म्हणून हे दोघे मित्र इतरांच्या जेवणाच्या वेळीं बाहेर निघून जात, आणि सर्व सामसूम झाल्यावर गचचिप खोलींत येऊन कॉफी व पावाचे तुकडे खाऊन भोजनसमारंभ उरकीत. इब्सेनला प्रत्यक्ष पाहिलेला त्याचा एक चरित्रकार लिहितो की, 'त्या दोघा मित्रांच्या चेहेऱ्यावर त्यांच्या परिस्थितीची पुसटही ओळख पटत नव्हती. आणि त्यांच्या खऱ्या परिस्थितीची मला कित्येक दिवस जाणीव झाली नाहीं.

क्रिश्चियाना येथें केलेल्या एक दीड वर्षांच्या वास्तव्यांत इब्सेननें विविध लेखन केलें. परंतु त्याच्या व्यापक लेखनाबरोबर त्याची कीर्ति पसरत होती तरी त्याचें आयुष्य अद्यापही अत्यंत अस्थिर होतें. त्याच्या रुबाबदार आकृतीवरून त्याला लवकरच बर्जेन येथें एका नाटककंपनीच्या स्टेज मॅनेजरची जागा मिळाली, व पुढील वर्षी त्याला त्याच कंपनीकडून रंगभूमीचा अभ्यास करण्यासाठीं प्रवास करण्याचें भर पगारी काम मिळालें. प्रवास पुरा केल्यानंतर स्टेज मॅनेजरचें पांच वर्षें काम करण्याची अट होती, तीही इब्सेननें कबूल केली. इब्सेनच्या नाटकांतील नाट्यशास्त्राच्या दृष्टीनें असलेलें निर्दोष पूर्णत्व व यश त्याच्या या नोकरीचेंच फळ होय. नाटककार

हा नाट्यव्यवसायी असेल तर नाटकाच्या यशांत भरच पडते हें शेक्सपिअरप्रामणेंच इब्सेनच्याही बाबतींत दिसून येतें.

नार्वेमधील नाटकगृहाच्या मॅनेजरचें काम इब्सेननें १० वर्षें केलें. आणि या अवधींत त्यानें जवळ जवळ १०० नाटकें आपल्या देखरेखीखालीं रंगभूमीवर आणलीं. त्यांत शेक्सपिअरचींही कांहीं नाटकें होतीं व विशेषत: तत्कालीन फ्रेंच नाटककारांपैकीं स्काइब या नाटककाराचींही यशस्वी नाटकें इब्सेननें बसवलीं. बर्जेन नाटक-गृहासाठीं इब्सेननें स्वत: सेंट जोन्स नाइट व आणखी तीन नाटकें लिहिलीं. १८५७ सालीं तो क्रिश्चियाना येथील नार्वेजियन नाटक-गृहाचा मॅनेजर झाला व त्याची पूर्वीची जागा त्याच्या एका मित्रानें घेतली. क्रिश्चियाना येथें इब्सननें शेक्सपिअरच्या नाटकांतील कथानकाच्या धर्तीवर एक नाटक लिहिलें. त्यानंतर इब्सेननें रोमॅंटिक नाटकें लिहिण्याचें सोडलें व वस्तवादर्शी ( Realistic ) नाटकें लिहिण्यास त्यानें सुरवात केली. 'कॉमेडी ऑफ लव्ह' या त्या वेळींच लिहिलेल्या एका नाटकांत इब्सेननें विनोदांत प्रच्छन्न उपहासात्मक टीका करून प्रणय व प्रणयाराधना यांची मनसोक्त टर उडविली आहे.

या सुमारास इब्सेनचा विवाह झाला. या औषधविक्याचें आयुष्य आमूलाग्र बदलून तो समाजांतील एक प्रतिष्ठित वाङ्मय-सेवक व जहाल टीकाकार म्हणून प्रसिद्धीस आला. या १८५७ ते १८६४ च्या काळांत इब्सेनचा 'इब्सेनिझम' खऱ्या स्वरूपांत व्यक्त होऊं लागला. दैनदिन गतीनें वाढत चाललेल्या कीर्तीनें इब्सेन मिंधा झाला नाहीं. मिळविलेली कीर्ति आतां यापुढें येनकेन प्रकारेण टिकवून धरावी असें त्याला कधीं वाटलें नाहीं. कीर्ति व वैभव मिळूं लागलें त्याचा इब्सेनवर कांहीं परिणाम झाला नाहीं. या मोहजालानें

तो गुप्त न होता जागा झाला. आपल्या व्यक्तित्वाला जगानें दिलेली ही भूल किंवा लांच त्यानें झिडकारून सामाजिक शिष्टसंमत रूढ अन्यायावर कोरडे ओढण्यास सुरवात केली. इब्सेनच्या असामान्यत्वास येथून सुरवात होते. 'कॉमेडी ऑफ लव्ह' या त्याच्या उपहासप्रधान नाटकांतील नायकाच्या द्वारें इब्सेननें एका पाद्रीबुवांना फेरावर घेतलें आहे. त्याचा परिणाम असा झाला कीं, १८६६ सालीं इब्सेनचा तनखा बंद करण्यात आला. त्या नाटकांत इब्सेनें 'मोहोतूर लावण्यासारख्या विवाहांतील एका धार्मिक विधीवरच टीका केली होती. इब्सेनवर सगळीकडून तीव्र टीकेचा भडिमार होऊं लागला. अप्रत्यक्षपणें त्याचे नाव सगळीकडे गाजत होतें व ज्यांना अद्यापपर्यंत इब्सेनविषयीं फारशी माहिती नव्हती ते लोक 'हा बंडखोर आहे तरी कोण?' अशा जिज्ञासेनें इब्सेनविषयीं चंवकशी करूं लागले. आपल्याविषयीं उत्पन्न झालेल्या या व्यापक जिज्ञासेचा इब्सेनला फायदाच झाला व त्याचें पुढील नाटक अल्पावधींतच विलक्षण लोकप्रिय होऊन त्याचे टीकाकार कांहीं काळ हतवीर्य झाले.

लवकरच इब्सेनचा पगार पुन्हां सुरू झाला व इब्सेननें क्रिश्चियानाहून युरोपमध्यें प्रवास करण्यासाठीं प्रयाण केलें. इटलीमध्यें इब्सेनला रोमच्या प्राचीन संस्कृतीचे अवशेष सर्वत्र दिसले. त्यानें त्या प्राचीन संस्कृतीचा विस्तृत परिचय करून घेतला व शेवटीं त्यानें त्या इतिहासावरून एक नाटक लिहिलें. तेंच "एंपरर अॅन्ड गॅलिलिअन" हें होय. हें नाटक १८७३ सालीं बाहेर पडण्यापूर्वीं इब्सेननें आपलें प्रसिद्ध 'ब्रॅंड' नाटक लिहिलें. मराठी वाचकांना ब्रॅंडची अगदीं ओझरती ओळख करून द्यावयाची असेल तर

रागिणींतील भय्यासाहेबांचें नांव सांगतां येईल. रूढ कल्पनांनीं भारला जाऊन, अव्यवहार्य ध्येयवादाला बळी पडून शेवटीं पश्चात्ताप झालेला असा ब्रँड नाटकांतील ब्रँड हा नायक आहे. व ब्रँड विषयीं शॉनें काढलेले उद्‌गार हे श्री. कोल्हटकर यांनीं भय्यासाहेबाबद्दल काढलेल्या उद्गारांशीं पुष्कळसे जुळतात. ब्रँड या नाटकांत पुन्हां एका ख्रिस्तसेवकाचा इब्सेननें समाचार घेतला आहे. "कॉमेडी ऑफ लव्ह" या नाटकामुळें उत्पन्न झालेलें वादळ अनुभवास येऊनहि इब्सेननें तितक्याच तीव्र टीकेनें ब्रँडचा समाचार घेतला. परंतु सवंग लोकप्रीतीसाठीं आपल्या प्रामाणिक मताला मुरड घालून, लोकांना आवडेल असा सूर काढण्यासाठीं इब्सेन आपल्या वीणेच्या तारा पिळण्यास तयार नव्हता. ब्रँड या नाटकामुळें समाजांत जो कोलाहल माजला त्यांतच इब्सेनच्या कीर्तीचेही कांहीं सूर होते. पुष्कळ वेळां, लोकक्षोभ हें भावी किंवा अव्यक्त लोकप्रीतीचें ओबडधोबड प्रतिबिंब किंवा आविष्करण ( disturbed image ) असतें. 'ब्रँड' या नाटकाच्या बाबतींत असेंच झालें. याच नाटकापासून इब्सेनला आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळण्यास सुरवात झाली. परंतु ब्रँडमुळें लोकांनीं आपली स्तुति करावी याबद्दल इब्सेनला विषाद वाटला ! कारण तो आपल्या हेतूचा विपर्यास आहे असें त्याला वाटलें व लोकांना माझें नाटक आवडलें पण समजलें नाहीं असे त्यानें उद्गार काढले. इब्सेनच्या वाङ्मयाची चर्चा करण्याचा हेतु प्रस्तुत नसल्यामुळें मोठ्या कष्टानें 'ब्रँड' चा येथेंच निरोप घेणें जरूर आहे.

'इब्सेनचा परिचय' या पुढील लेखांकांत इब्सेनच्या वाङ्मयाचा परिचय लेखकानें करून देण्याचा विस्तृत प्रयत्न केला आहेच.

'ब्रँड' एका डॅनिश प्रकाशकानें १८६६ त प्रसिद्ध केलें. आणि नाटकाच्या प्रसिद्धीकरणापासून इब्सेनला लोकप्रीतीच्या मार्गावरील उन्हाचा व सांवलीचा आळीपाळीनें अनुभव येऊं लागला.

परंतु इब्सेनचें वैयक्तिक जीवन अद्याप खडकाळ मार्गांतूनच चाललें होतें. वाङ्मयांतील यश हें मानसिक समाधान देत होतें व त्यामुळें जीवितांतील पार्थिव संकटें सहन करण्यास इब्सेनला जरा धीर आला इतकेंच. इब्सेनचें लिखाण हा जगांत एक चर्चेचा विषय होत होता, त्याच वेळीं स्वतः हेन्री दारिद्र्याच्या अननुभूत यातना भोगीत होता! दररोजच्या पत्रांना उत्तरें पाठविण्यासही त्याजजवळ तिकिटापुरते पैसे नसत! आणि कोपनहेगन मधून त्याला आपल्या स्तुतिस्तोत्रांचे ध्वनि कानीं पडत त्या वेळीं तो जेवणासाठीं व भाड्यासाठीं कर्ज मागण्याकरितां रोमच्या डॅनिश सभेकडे खेपा घालीत होता. या सांपत्तिक आपत्तीखालीं चिरडून जाण्यापेक्षां स्कॅंडिनेव्हिआचे राजे कार्ल यांजकडे मदतीसाठीं अर्ज करावा असा हेन्रीच्या मित्रानें त्याला सल्ला दिला, आणि इब्सेनच्या या स्थितीचा लवकरच नावेंत बोभाटा होऊन वाङ्मयसेवक हेन्रीच्या वैयक्तिक आयुष्याची चर्चा वर्तमानपत्रांत सुरू झाली. त्याला सगळीकडून सहानुभूति मिळाली व ता. १० मे १८६६ रोजीं इब्सेनला स्कॅंडिनेव्हियाच्या राजदरबारांतून 'पोएटस् पेन्शन' मंजूर झालें. परंतु पेन्शनची रक्कम ऐवजापेक्षां मानानेंच मोठी होती. अडचणी वाढत चालल्यामुळें इब्सेननें आपली पत्नी व लहान मुलगा यांसह रोम शहर सोडलें व फ्रॅस्काटी या डोंगराळ गांवीं वास्तव्य केलें. या काळच्या त्याच्या पत्रांतून अगदीं नवीनच अशी थोडीशी आशावादाची व आनंदाची छटा दिसते. कांहीं दिवसांनीं

पुन्हां रोमला परत येऊन Peer Gynt हें ऐतिहासिक नाटक लिहिण्यास त्यानें सुरवात केली. आपल्या तरुणपणाच्या परिस्थितीचें पुष्कळसें हुबेहूब चित्र या नाटकाची पार्श्वभूमि आहे असें स्वतः इब्सेन म्हणतो. नाटक पुरें होतांच तें कोपनहेगला पाठविण्यांत आलें व अल्पावधींतच १८६७ च्या नोव्हेंबरमध्यें तें प्रसिद्ध झालें. १८६४ ते १८६८ हा चार वर्षांचा काळ इब्सेननें इटलींत पूर्ण विश्रांति घेण्यांत घालवला. त्याची विवंचना दूर झाली होती, कीर्ति देशोदेशी पसरत होती, हळुहळू त्याचें तत्त्वज्ञान त्याच्या ग्रंथांतून तयार होत होतें व जरी त्याच्या चढाईच्या धोरणास अद्याप सुरवात झाली नव्हती तरी त्यासाठीं आवश्यक असें पुरेसें सामर्थ्य व स्वावलंबन त्यानें संपादन केलें होतें. मार्च १८६८ मध्यें इब्सेनला आपल्या देशांतील राजकीय प्रक्षुब्ध वातावरणामुळें अस्वस्थ वाटूं लागलें व त्यानें रोम शहर सोडलें. आणि आल्प्स् पर्वताच्या भागांत तो जाऊन राहिला. तेथें त्यानें आपलें 'लीग ऑफ यूथ' हें पंचांकी नाटक लिहावयास घेतलें. सप्टेंबरमध्यें तो म्यूनिचला गेला व आक्टोबरमध्यें ड्रेस्डेन गांठलें. तेथें मात्र बरीच वर्षें त्यानें वास्तव्य केलें. या वेळीं त्याची वृत्ति पुन्हां कांहींशी आत्मनिष्ठ व चिंतनपर झालेली दिसते. रोमप्रमाणेंच ड्रेस्डेनच्या रस्त्यांतून तो शून्यमनस्क होऊन हिंडत असे. पत्रव्यवहार त्यानें एकदम कमी केला. मित्रांच्याही तो फारच क्वचित् भेटी घेई. हातीं घेतलेलें नाटक तो हळुहळू संपवीत होता व तें १८६९ मार्चमध्यें पूर्ण झालें. अद्यापही तो गरीबच होता. तरीसुद्धां पैशासाठीं कोणी लिहावयास सांगितलें तर तें तो साफ नाकारी. सावकाश अभ्यासपूर्वक लिहिलेलेंच लेखन कालावधीनें प्रसिद्ध व्हावें यांतच त्याला समाधान वाटे.

इब्सेनच्या टीकाकारांत ब्रँडस् या टीकाकारानें इब्सेनवर बरीच तीव्र टीका केली होती. परंतु त्या टीकेला उत्तर देण्यासाठीं लांबलचक पत्रें लिहिण्याचा त्याला अलीकडे तिटकारा आला होता. म्हणून ब्रँडस्ची एकदा भेट घ्यावी अशी त्याची पुष्कळ दिवसांपासून इच्छा होती व शेवटीं १८७१ च्या जुलैंत ब्रँडस् रोमहून डेन्मार्ककडे जात असतां ड्रेस्डेनला आला, व आपल्या टीकाकाराशीं इब्सेननें अत्यंत मनमोकळेपणानें संभाषण केलें.

१८७७ च्या आक्टोबर ११ ला 'पिलर्स ऑफ सोसायटी' हें नाटक प्रसिद्ध झालें व स्कँडिनेव्हियामधील सर्व नाटककंपन्यांकडून त्याच्या प्रयोगासाठीं मागणी करण्यांत आली. बर्लिनला त्या नाटकाचा १८७८ त प्रयोग झाला. आणि २५ वर्षांच्या अवधींत जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांत त्या नाटकाचे १२०० प्रयोग झाले. १८८०च्या डिसेंबरमध्यें याच नाटकाच्या द्वारें इब्सेनचें नाटक पहिल्याप्रथमच इंग्लिश रंगभूमीवर लंडन येथें आलें. १८९१ त न्यूयॉर्कला त्याचा प्रयोग झाला, व फ्रान्समध्यें १८९६ त प्रयोग झाला !

यापुढील इब्सेनचें सामाजिक नाटक 'डॉलस् हाऊस'.( बाहुलीचें घर) हें होय. 'डॉलस हाऊस्' या नाटकामुळें जर्मन समाजांत बराच ऊहापोह झाला व कांहीं ठिकाणीं तर नाटकाचा शेवट बदलून ( नायिका घरांतून निघून न जातां पुन्हां समेट करून ) प्रयोग करण्यांत आले. पिलर्स ऑफ सोसायटी या नाटकामुळें लोकक्षोभ उत्पन्न होईल अशी इब्सेनची जी अपेक्षा होती, ती डॉलस् हाऊस या नाटकाच्या वेळीं खरी ठरली. परंतु भयंकर विरोधी टीकेमुळें त्याचा स्वतःच्या मतावरचा विश्वास कमी न होतां बलवत्तर झाला. आपल्या एका जर्मन भाषांतरकारास उत्तर देतांना इब्सेन म्हणतो,

‘ मी जें जें लिहिलें आहे त्या वस्तुस्थितींतून मी माझ्या जीवनाचा मार्ग चालत आलों आहे. माझ्या प्रत्येक नाटकांत किंवा कवितेंत माझें आत्मसंशोधन, आत्मशुद्धीकरण व आत्मस्वातंत्र्य मिळविण्याचा माझा हेतू आहे. कारण प्रत्येक व्यक्ती आपल्या भोंवतालच्या समाजांतील जबाबदारीची व दोषांची हिस्सेदार असतेच. ’

घोस्ट या नाटकांत इब्सेननें डॉलस् हाऊसच्या टीकाकारांस उत्तर दिलें आहे. १८८० त त्यानें एक नाटक लिहावयास घेऊन अर्धवटच सोडून दिलें व तें पुढें ‘ लेडी फ्रॉम दी सी ’ या नांवानें पुरें करून प्रसिद्ध केलें. १८८० च्या शरद ऋतूंत पुन्हां इब्सेनला रोमला जाण्याची लहर आली. या वेळीं आपला मनोविकास स्पष्ट करण्यासाठीं एक विस्तृत आत्मचरित्र लिहिण्याचा त्याचा विचार होता. व त्याला ‘ स्कीन ते रोम ’ हें नांवही ठरविलें होतें. परंतु वयाच्या ५२ व्या वर्षी केलेला हा विचार सिद्धीस गेला नाहीं. १८८१ त त्याला ‘ घोस्ट ’ या नाटकाचें कथानक सुचलें. डॉलस् हाऊस या नाटकांत नायिकेच्या द्वारें अन्यायाचा व आयुष्याच्या पोरखेळाचा धिःकार केला आहे. परंतु त्यांत स्त्री स्वातंत्र्यापेक्षा व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार हाच इब्सेनचा मुख्य हेतु होता. घोस्ट प्रसिद्ध होतांच स्कॅंडिनेव्हियन वर्तमानपत्रांत आरडाओरड सुरू झाली. स्तुतीचीं व निंदेचीं पत्रें इब्सेनला दररोजच्या डाकेनें येत होतीं. कोणचीहि जर्मन कंपनी हें नाटक घेणार नाहीं अशी इब्सेनची खात्री होती. आणि १८८३ पर्यंत त्या नाटकाचा कोठेंही प्रयोग झाला नाहीं. १८८३ त स्वीडनमध्यें पहिल्यानें प्रयोग झाला व मागून १८८७ त जर्मनींतही झाला !

घोस्ट सारखीं सामाजिक चालीरीती व विशेषत: अन्यायाकडील

व आत्मसंशोधनाकडील हेतुपुरस्सर दुर्लक्ष यावर सडेतोड टीका करणारीं नाटकें इब्सेननंतर पुष्कळच लिहिलीं गेलीं आहेत. परंतु ज्या समाजांत ते दोष सर्वत्र पसरले होते त्याच समाजाच्या डोळ्यांसमोर तें स्पष्ट करण्याचें पहिलें धाडस इब्सेननें केलें हें लक्षांत ठेवलें म्हणजे या नाटकांनीं उठवलेली टीकेच्या प्रहारांची तीव्रता आपणास अजमाविता येईल.

यानंतरच्या '<u>एनिमी ऑफ दी पीपल</u>' या नाटकांत इब्सेननें अशाच एका ध्येयवादाचा धुव्वा उडविला आहे. समाजाच्या खालच्या थरांत सांचलेला अनीतीचा गाळ इब्सेननें प्रत्यक्ष आपल्या आयुष्यांत पाहिला होता, आणि हा गाळ हेतुपुरस्सर झांकून ठेवून व राखून ठेवून आपला संभावितपणा व वासनातृप्ति यांची एकाच मार्गानें सोय करण्याचा प्रयत्न समाजांतील शिष्टांकडून केला जातो हेंही त्यानें अनुभविलें होतें. आणि सामाजिक नैतिक व्यवहारांतील ही भांडवलशाही त्यानें तिच्या मूळ भयंकर स्वरूपांत या नाटकांत विवरण केले आहे. असे प्रयत्न करणाराच 'समाजाचा शत्रू' ठरतो! अप्रियस्यापि पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभ: तें असें!

इब्सेनच्या या काळांतील मनोवृत्तीचें स्पष्ट दर्शन त्याच्या 'वाइल्ड डक' या पुढील नाटकांत होतें. 'वाइल्ड डक' या नाटकाचें उद्दिष्ट मात्र अगदींच निराळें आहे. परंतु थोड्याफार फरकानें तोसुद्धां एका अव्यवहार्य ध्येयवादाचा उपहासच आहे, असें सहज दिसून येईल. असामान्य असा ध्येयवाद लोकांच्या मानगुटीं मारून अज्ञानाच्या अंधारांत लोकांना कोंडून आपल्या ज्ञानाची करामत दाखविण्याचे समाजशिष्टाचे प्रयत्न हाणून पाडावेत व या इभ्रतीच्या

भुतापासून सामान्य लोकांची मुक्तता करावी हाच इब्सेनच्या लेखनाचा व्यापक हेतु सर्वत्र प्रत्ययास येतो.

१८८८ ते १८९९ या काळांत इब्सेननें सहा सात नाटकें लिहिलीं. परंतु पुढील सहा वर्षांत एकही नाटक लिहिलें नाहीं. १८९९ च्या पुढें वयाच्या ७० व्या वर्षापासून त्याची प्रकृति जोरानें ढांसळत चालली. त्याच्या साठाव्या वाढदिवशीं त्याचें 'लेडी फ्रॉम दि सी' नाटक प्रसिद्ध झालें. इब्सेनचें शेवटलें नाटक 'व्हेन वुइ डेड अवेकन्' हें आहे. आणि यानंतर स्वतः इब्सेनचा मृत्यु हाच त्याच्या आयुष्यांतला शेवटचा प्रसंग आहे! मध्यंतरीच्या काळांत इब्सेननें लिहिलेलीं सर्व नाटकें निरनिराळ्या गुणोत्कर्षानें प्रसिद्ध आहे, Little Eyolf हें त्याचें नाटक टॉलस्टायच्या 'क्रूझर सोनाटा' या जगद्विख्यात पुस्तकाची आठवण करून देणारें आहे.

युरोप व अमेरिका येथील रंगभूमीवर होणारा इब्सेनच्या नाटकाचा गौरव व स्वागत हें त्याच्या यशाचें प्रतीक असलें तरी ती त्याच्या जीवितहेतूची ओळख नव्हे. इब्सेनच्या जीविताचें उद्दिष्ट समजावें म्हणून त्याचीं नाटकें वाचण्यासाठींच लिहिलीं आहेत. फ्रान्समध्यें इब्सेनचा फारसा विस्तार झाला नाहीं, तरी इब्सेनच्या नाटकांतील भूमिका घेऊन जगांत कितीतरी नटांनीं व नटींनीं कीर्ति संपादन केली आहे. एका फ्रेंच नटीनें नोराची भूमिका यशस्वी रीतीनें केल्याबद्दल इब्सेननें तिचें तार पाठवून अभिनंदन केलें. विशेषतः जर्मन रंगभूमीवर इब्सेनचें नेहमींच अपूर्व स्वागत झालें आहे.

इब्सेनच्या लेखनाचा वाङ्मयामधील दर्जा व वाचकावरील परिणाम व त्याचें चिरस्थायित्व यांचा अंदाज करण्याइतका पुरेसा

काळ अद्याप लोटला असें कांहीं लेखक म्हणतात. परंतु बर्नार्ड शॉ यांनीं इब्सेनचें जगाच्या वाङ्मयांतील स्थान ठरवितांना टॉल-स्टायबरोबर इब्सेनचा उल्लेख केला आहे व पुढें शॉ म्हणतात, "इब्सेन व टॉलस्टाय हे बुद्धिमत्तेनें मोलीयर किंवा शेक्सपिअरपेक्षां निराळ्या प्रकारचे किंवा श्रेष्ठही नव्हते. तरी जे वाचक शेक्सपिअर किंवा मोलीयर अथपासून इतिपर्यंत शांतपणें वाङ्मयीन आनंद उपभोगीत वाचूं शकत असत ते इब्सेन व टॉलस्टाय वाचूं लागले म्हणजे मानसिक कोलाहल उत्पन्न होतो, त्यांच्या विचारसरणीला धक्के बसतात व तरी पदोपदीं वाढत जाणाऱ्या अस्वास्थ्यांतही पुस्तक पुरें केल्याखेरीज राहवत नाहीं" अशी विलक्षण पकड या ग्रंथकारांची वाचकांच्या मनावर बसते.

(Tolstoy and Ibsen together gifted as they were, were not otherwise gifted or more gifted than Shakespeare and Moliere. Yet a generation which could read Shakespeare and Moliere from end to end without the smallest intellectual or ethical perturbation, was unable to get through a play by Ibsen or a novel by Tolstoy, without having its intellectual or moral complacency upset, its religious faith shattered, and its notions of right and wrong conduct thrown into confusion and sometimes reversed. It is as if these modern men had a spiritual force that was lacking in even the greatest of their forerunners.

—*B. Shaw.*

या शब्दांत इब्सेनचें वाङ्मयांतील स्थान पुरेसें स्पष्ट झालें आहे. तरीसुद्धां टॉलस्टॉय व इब्सेन यांच्यांत विरोध नसला तरी पुरेसा भेद होता व तो स्पष्ट करण्याची इब्सेनचे रशियन टीकाकार नेहमीं काळजी घेतात !

वाङ्मयांत आत्मसंशोधन व निर्घृण सत्याचें निष्ठुरपणें आविष्करण या प्रवृत्तींचें युग टॉलस्टॉय व इब्सेन यांनीं सुरू केलें.

२३ मे १९०६ रोजीं दुपारीं ड्रॅमेन्स्वेज येथें क्रिश्चियाना रॉयल गार्डनच्या समोरील आपल्या रहात्या घरांत इब्सेन यानें आपलें अवतारकार्य पुरें केलें. त्याच्या प्रेतयात्रेस नॉर्वेचे राजे व सातव्या एडवर्डचे प्रतिनिधी म्हणून ब्रिटिश वकील स्वत: हजर होते.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
संदर्भ शाखा (स्वतंत्र प्रत)

# भूमिका : : : २

" Social progress takes effect through the replacement of old institutions by new ones .....There is nothing new in the defiance of duty by the reformer. Every step of progress means a duty repudiated and a scripture torn up and every reformer is denounced accordingly."

—*B. Shaw.*

प्रभु रामचद्र वनवासांत असतांना रावणानें सीतामाईचें हरण केलें. सीतेच्या वियोगानें प्रभु व्याकुल झाले, आणि ' हा सीते ! हा सीते ! ' असा हृदयविदारक आक्रोश करीत त्यांनीं शोध चालविला होता. आपला सुगावा लागावा म्हणून सीतामाईनें जातां जातां

रस्त्यावर आपल्या अंगावरचे अलंकार जागोजागीं टाकले होते. ते अलंकार पाहून एके प्रसंगीं प्रभूंनीं लक्ष्मणास विचारलें, "लक्ष्मणा, हे अलंकार जानकीचेच नव्हत काय? आणि लक्ष्मणानें दिलेलें उत्तर अगदीं सुभाषितासारखें प्रचलित आहे कीं, "नूपुराण्येव जानामि" "मला सगळें अलंकार कसे ओळखतां येणार? मी फक्त सीतामाईचीं नूपुरेंच ओळखतों!" त्या महात्म्यानें सीतामाई ही परस्त्री म्हणून फक्त तिच्या चरणाकडेच दृष्टि ठेवली होती आणि तेंही तिच्या पायांचें अभिवादन करण्याचा प्रसंग येई म्हणून! सीतामाईच्या पावलापलीकडे त्या सत्वशील क्षत्रियाला सख्या भावजयीच्या अस्तित्वाची जाणीव नव्हती! लक्ष्मणासारखा सत्वप्रधान, कर्तव्यकठोर महात्मा परंतु त्यानें सख्या भावजयीच्या स्त्रीत्वाचा एवढा बाऊ करावा हें पाहून आपणास आज आश्चर्य वाटतें! स्त्रियांच्या स्त्रीत्वाचा हा अवास्तव गहजब हाच तत्कालीन समाजांत एक सद्गुण मानला जात होता. आज स्त्रियांच्या स्त्रीत्वाच्या अज्ञानाबद्दलच केवळ कोण कौतुक करणार आहे?

स्त्रियांच्या स्त्रीत्वाबद्दल अशी एक जबरदस्त दहशत प्राचीन समाजाला बसलेली दिसते. प्रत्येक समाजाला आयुष्याच्या वाटेवर अनाहूत अशा कांहीं नवीन नवीन प्रवृत्तींशीं तोंड द्यावें लागते. सामाजिक जीवनाच्या ओघांत परिस्थितीचें कांहीं तरी विचित्र मिश्रण तयार होतें आणि त्या अननुभूत परिस्थितीला तोंड देतांना समाज नेहमीं हतबुद्ध होतो. आकाशांत एकदम ढग जमावे, विजा चमकूं लागाव्यांत, वादळ उठावें ही परिस्थिती उत्पन्न झाली कीं वेदकालीन समाज लगेच वरुणाचीं पर्जन्याची स्तोत्रें गावयास सुरवात करी; कारण त्या परिस्थितीवर कोणचा उतार लागूं पडेल हें अचूक

ओळखणें शक्य नव्हतें. अशा वेळीं त्या परिस्थितीवरच पांघरूण घालण्याचा प्रयत्न समाज करतो. परंतु पुढें पुढें मागील काळांत शेंदूर फासून दगड केलेल्या देवांचें दगडपण उघडकीस आणणारे लोक उत्पन्न होतात. पर्जन्यकाळच्या वादळाकडे संथपणें पाहून त्याच्या हातांपायां न पडतां पर्जन्याला तोंड देऊन ताबा चालविण्याचें धैर्य समाजास उत्पन्न होतें. आज आपणास सूर्योदय, सूर्यास्त, वादळ, ग्रहण या गोष्टींचें पृथःक्करण करण्याइतका निर्धास्तपणा वाटत आहे. त्याच या गोष्टीविषयीं वेदकालीं कोण गहजब ! अशा रीतीनें मूलभूत अशीं नवीन नवीन सत्यें समाजांत परिस्थितीच्या वळणांत पुढें येतात व त्या नवीन परिस्थितीचा प्रचलित जीवनाशीं कसा मेळ घालावयाचा हें न सुचल्यानें समाज ती परिस्थिती झांकून टाकूनच रेटण्याचा प्रयत्न करूं लागतो. स्त्रियांचें स्त्रीत्व व नैसर्गिक आकर्षण या गोष्टी सामाजिक जीवनांत जसजशा स्पष्टपणें व्यक्त होऊं लागल्या तसतसें समाजाला या प्रवृत्तींचा मेळ घालतां येईना व त्या प्रवृत्तीचा नायनाटही करतां येईना; तेव्हां त्या नूतन प्रवृत्तींनीं प्रचलित स्वास्थ्य बदलून बिघडवण्यापेक्षां त्या अननुभूत प्रवृत्तींना दडपण्याचा प्रयत्न सुरू झाला. " जेव्हां अनावर प्रबल होईल तेव्हां पाहून घेऊं " अशा वृत्तीनें नैसर्गिक आकर्षणाचीं पाळेंमुळें खणून काढण्यासाठीं लक्ष्मणासारखी प्रवृत्ति हाच आचारधर्म असा एक दंडक समाजानें घातला. अशा रीतीनें स्त्रियांचें स्त्रीत्व व नैसर्गिक आकर्षणाचा उगमच बंद केल्यानंतर मग त्या आकर्षणाचा विकास, नियंत्रण व परिणाम यांचा विचार करावयाचा कशाला ? पातिव्रत्य हें स्त्रीजीवनाचें पूर्णत्व व एकमेव सार्थक ठरविल्यावर मग स्त्री-स्वातंत्र्य, समान हक्क, वैवाहिक संमति याप्रश्नांची चर्चा होते कशाला ?

अशा रीतीनें प्रत्येक समाज आपल्याला सुटत नाहींत अशीं गूढें त्या गूढांवर निषेधात्मक आचारधर्मांचें पांघरूण घालून झांकून ठेवतो.

स्त्रियांना सामाजिक जीवनांत वगळतां तर येईना कारण नैसर्गिक आकर्षण. बरें पुन्हां या आकर्षणाचें सामाजिक स्वरूप व स्थान कोणचें हेंही ठरवतां येईना; तेव्हां तत्कालीन समाजानें स्त्रियांचें जीवितस्वातंत्र्यच हिरावून त्यांना पुरुषवर्गाशीं डांबून टाकलें! त्या-विरुद्ध जाईल ती कुलटा! पतीच्या पाठीमागें विधवा पत्नीचें काय करावयाचें या प्रश्नाचें उत्तर समाधानकारक सांपडेना. बरें पती आधीं मरावा कीं मागून मरावा हें कोणाच्या हातांत आहे?

तेव्हां अशा स्त्रियांचें काय करावें या प्रश्नानें समाज साहजिकच गोंधळून गेला. पती जिवंत असेपर्यंत स्त्रियांमधील स्त्रीत्वाच्या जबरदस्त सामर्थ्याचें कसेंबसें निर्मूलन व नियमन होत होतें; परंतु पतीच्या मृत्यूनंतर या सामर्थ्याचें नियमन कसें करणार या प्रश्नानें गोंधळून जाऊन समाजानें 'सती' व 'वैधव्य' हे दोन उपाय शोधून काढले. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला जीवन नकोसेंच होतें. असा आडाखा समाजानें स्वतःच्या सोईसाठीं गृहीत धरला व सतीची चाल, शेवटीं शेवटीं स्त्रियांना नाना तऱ्हेचें-पेयें वगैरे पाजून- आगीचे चटके सहसा जाणवूं नयेत अशी खटपट करून पतीच्या चितेवर होम करण्यापर्यंत पराकाष्ठेला गेली. स्त्रियांच्या जीवनशक्तीचें कोणी-कडून तरी निर्मूलन करण्याचा इतका प्रचंड अट्टाहास समाजानें केला कीं, स्त्रियांना आपल्या आयुष्याचें काय होतें हें विचार करण्याइतकी सुद्धां सवड मिळाली नाहीं. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्याची घडण ती जन्माला येण्यापूर्वींच ठरलेली. पतीच्या चितेवर चार लोकांनीं धरून पत्नीला लोटतांना तिच्या हृदयद्रावक किंकाळ्या

ऐकून भोवतालच्या लोकांचें अंत:करण पिळवटत नसेल असें नाहीं. त्याचीं अंतकरणें दगडाची खास नव्हतीं. त्यांना सतींचे हे हाल पाहून अत्यंत कळवळाही येत असे. परतु करणार काय बिचारे! त्यांना त्या स्त्रीच्या स्त्रीत्वाची जबरदस्त दहशत होती. साप डसल्यावर जीव वांचवण्यासाठीं आपण करंगळी, हात, पायसुद्धां तोडण्यास तयार होत नाहीं का? त्यावेळीं हातावर काय आपलें प्रेम नसतें? त्याचप्रमाणें स्त्रीत्वाच्या विषानें दूषित झालेल्या त्या व्यक्तीला समाज मोठ्या कष्टानें भस्मसात करीत असे आणि या कृत्यांतील क्रूरता, भेसूर सत्य डोळ्याआड करण्यासाठीं त्या सतीच्या आरोळ्या कानावर येऊं नयेत म्हणून पतिव्रता धर्माचा मंत्रघोष सर्वत्र दुमदुमून जात असे.

'वैधव्य' हाही एक असाच उपाय होता. स्त्रीमधील स्त्रीत्व निर्मूलन करण्यासाठीं तिच्या देहाची विटंबना करून तिचें सर्व सामाजिक हक्क लुबाडून जवळ जवळ मृतवत् आयुष्य त्यांना काढण्याची सक्ती होती. एखाद्या पतीनें आपल्या पाठीमागें आपल्या पत्नीनें सती जावें कीं विधवा व्हावें असा स्वत:शीं विचार केला तर वैधव्यांतील सामाजिक विटंबनेपेक्षां सतीत्वाची बळजबरी त्याला किंवा त्या पत्नीलाहि बरी वाटावी असा वैधव्याचा प्रकार! परंतु हें सामाजिक अज्ञान व अन्याय पाहून आज आपणास तिरस्कार वाटत आहे, तसें त्याही समाजातील सूज्ञ माणसांना त्याबद्दल तळमळ वाटत होती. परंतु स्त्रियांमधील स्त्रीत्वाची परीक्षा पाहणें म्हणजे विषाची परीक्षा पाहणें किंवा सापाला दूध घालून त्याची दोस्ती करण्याचा प्रयत्न करणें असें त्यांना वाटत होतें. त्याला ते तरी काय करणार!

प्रत्येक समाजांत अननुभूत अशा नैसर्गिक प्रवृत्तीवर असे बुरखे चढवून त्याबद्दल गहजब माजवलेला असतो. कांहीं जानटो देव ज्याप्रमाणें माणसाचें रक्तच मागत असतात, त्याप्रमाणें या अज्ञानाच्या अट्टाहासापायीं हजारों जुलूम उघड्या डोळ्यानें होत असतात. शेवटीं एखादा इब्सेन समाजांतून पुढें येतो आणि या रूढीचे पडदे फाडून त्या नैसर्गिक प्रवृत्तीवर प्रकाश पाडून दाखवतो !

नियमासाठीं माणसें नसून माणसासाठीं नियम आहेत हें तो धैर्यानें सांगतो. ज्या देवाच्या नांवानें सारखा नरमेध चालला असेल तो देव नसून राक्षस आहे, दगड आहे हें तो ओरडून सांगतो. ज्या पतिव्रताधर्मापायीं जगांतील अर्ध्या लोकसंख्येवर अनन्वित अन्याय, जुलूम, छळ होत आहे तो धर्म नसून अरेरावी आहे, असें एखादा सुधारक जाहीर करतो. अशा रीतीनें सामाजिक उत्क्रांती म्हणजे समाजांतील रूढ अज्ञानाचे पडदे फाडून सत्याचें दर्शन व परिचय करून देण्याचा प्रयत्न होय. ज्या देवापायीं हजारों सुखांचा समाजानें होम केला, तो देव नसून शेंदूर लावलेला दगड आहे असें एखादा माणूस प्रथम सांगू लागला कीं, समाजाकडून त्याची दगडांनीं पूजा होते. ज्या सत्यावर समाजानें पांघरुण घातलें असतें, त्या सत्याचें नग्न दर्शन समाजाला घेववत नाहीं ! प्रचलित रूढीविरुद्ध चाललेली ओरड समाजाला अन्यायाची वाटते, ते विचार अधःपातास नेणारे वाटतात व दयाधर्मशील असाच समाज सुधारकांचा अनन्वित छळ करण्यास ‘ कर्तव्य ’ म्हणून पुढें येतो ! छळ करणारे लोक अन्यायानें गांजलेलें नसतात तर अन्यायाचे प्रवर्तक असतात. अन्यायाखालीं चिरडले जाणारे रूढीचा मुका मार सहन करीत असतात !

वैधव्याचा सामाजिक स्वास्थ्यासाठीं पुरस्कार करणारा वर्ग हा

विश्वयाच्या नसतो हें आश्चर्य होय! अशा रीतीनें सत्यप्रवर्तकांचा छळच होतो हें ऐतिहासिक सत्य आहे. जनतेला हक्कांची जाणीव देणारा पुढारी दरवडेखोरापेक्षां जास्त भयंकर शिक्षेस पात्र ठरावा हें सरकारी धोरणच सामाजिक क्रांतीच्याहि वेळीं अनुभवास येतें. इब्सेनची अशीच संभावना झाली. बर्नार्ड शॉ यांनीं आपल्या इब्सेनवरील ग्रंथांत इब्सेनवर तत्कालीन संभावित वृत्तपत्रांनीं चोंहों-कडून जो शिव्याशापांचा भडिमार केला त्या अपशब्दांची नोंद केली आहे! ती नोंद वाचली कीं, माणसें इथून तिथून सारखींच असें पटतें! गत इतिहासांतील कोंणत्याही सामाजिक उत्क्रांतीचा इतिहास आज वाचला तर हेंच दिसून येईल. 'गुलाम बाळगणें' हाही एकेकाळीं समाजांतील संभावित लोकांचा व्यवसाय होताच कीं नाहीं! तेव्हां उत्क्रांतीच्या काळीं ज्या तत्वावर सामाजिक गह-जब होत असतो त्या तत्वांची योग्यता ही बहुमतानें कधीच मोजतां येत नाहीं! टिळकांनीं आपल्या आयुष्यभर सुधारकांवर मोहीम केली! परंतु त्यांनासुद्धां सामाजिक अन्यायाची रुखरुख नव्हती असें नाहीं! समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत प्रजोत्पत्ति हें एक सामाजिक कार्य होतें, परंतु आज प्रजोत्पत्तीस आळा घालणें, हेंच सामाजिक स्वास्थ्यास आवश्यक आहे, अशा तऱ्हेचे विचार त्याच्या लेखांत मधून मधून आढळतात, तेव्हां टिळकांचा सुधारकांशीं प्रामाणिक मतभेद होता कीं लोकप्रीतीसाठीं बुद्धिपुरस्सर आत्मवंचना होती असा एखाद्यास संशय उत्पन्न होतो!

इब्सेननें आपल्या नाटकातून सामाजिक अन्यायांवर जे कोरडे ओढले आहेत, त्याबद्दल त्याला जबरदस्त अन्याय सोसावा लागला! त्याच्या नाटकांतील नायक हे सुधाकरासारखे बुद्धिमान, संभावित

व सुधाकरासारखेच शेवटीं अधःपातास गेलेले आहेत. त्यामुळें समाजांतील संभावित अनाचारावर प्रकाश पडून ढेकणांच्या गादीवर एकदम विजेच्या प्रकाशाचा झोत पडल्यावर त्याची जशी गाळण उडावी तशी संभावितांत खळबळ झाली ! परंतु संभावितांखेरीज इतर समाजानें इब्सेनला धन्यवाद दिले ! अन्यायाखालीं चिरडल्या जाणाऱ्या दीन अनाथांनीं इब्सेनला सामाजिक अन्यायाच्या हल्ल्यांतून तोलून धरला ! इब्सेनचा अनुयायी म्हणून बर्नार्ड शॉ यांच्यावर सुद्धां शिष्टांनीं अस्त्र उचललें होतें. परतु कोंबडा झांकला तरी सूर्य उगवल्याखेरीज रहात नाहीं, त्याप्रमाणें शेवटीं या सामाजिक अन्यायाला सगळीकडून वाचा फुटलीच ! बर्नार्ड शॉ यांनीं आपल्या इब्सेनवरील ग्रंथांत सामाजिक उत्क्रांतिविषयीं जे उद्गार काढले आहेत ते आरंभीं दिले आहेत. आपणास स्वतंत्र असें आयुष्य नसून हार्मोनियम, सतार, खेळ, चैनीच्या वस्तू यासारखेंच पुरुष वर्गाच्या करमणुकीसाठीं आपलें आयुष्य आहे, असें स्त्रियांना जें पटवण्यांत येत होतें, तशीच त्यांची फसवणूक होत राहिली असती, तर आज स्त्रीसमाजांतून जें सामर्थ्य प्रकट होत आहे तें झालें नसतें ! "बायकांच्या जातीला हें शोभत नाहीं" या सामाजिक ड्भ्रनीच्या पोकळ हाकाटीला स्त्रिया मान तुकवीत राहिल्या असत्या तर जिवंतपणाला न शोभणारे लाजिरवाणें आयुष्य आणखी कित्येक युगें त्यांना काढावें लागलें असतें ! पंडित जवाहिरलाल नेहरु यानीं एका महिला परिषदेसमोर सांगतांना स्त्रियांना हेंच सांगितलें कीं "प्रत्येक लहानसहान हक्कासाठीं स्त्रियांना झगडे करावे लागले आहेत. पुरुषवर्ग, समाजांतील प्रचलित 'शिष्टसंप्रदाय' हे सरकारलाही मागें टाकणारे आहेत ! कारण युगानुयुगे चालत आलेली अनियंत्रित सत्ता कोण सुखासुखी

सोडणार आहे ! परंतु अरेरावीच्या जोरावर टिकणारें सामाजिक स्वास्थ्य हें स्वास्थ्य नव्हे ! तो समाज ज्वालामुखीपर्वतावरील रम्य उद्यानासारखा आहे ! या ज्ञानयुगांत अज्ञानावर सत्ता गाजवण्यांत कोणालाहि कमीपणाच वाटला पाहिजे. युरोपियन समाजाची आंदोलनें हीं मानवी वृत्तीचीं आंदोलनें आहेत. तीं देशकालापुरतींच मर्यादित नाहींत." इब्सेनच्या तत्त्वज्ञानानें त्या समाजातील उत्क्रांतीच्या कालास सुरवात झाली आहे. म्हणून इब्सेनच्या ग्रंथांचा परिचय आपणास उद्बोधक होणार आहे. इब्सेनचीं डॉलस् हाऊस, 'Ghost' वगैरे नाटकें अगदीं आपणास परिचित अशीं सामाजिक चित्रें दाखविणारीं आहेत. मनोभूमिकेवरून इब्सेनचा विचारसंप्रदाय आपणास अत्यंत निकट आहे हें पुढील लेखांकावरून प्रत्यक्ष दिसून येईल. युरोपीयन समाजांतील उत्क्रांतीसुद्धां चुटकीसरशी झाली नाहीं. त्याही समाजांत संभावित हटवादी होतेच. बर्नार्ड शॉ यांनीं आपल्या ग्रंथांत एक उदाहरण दिलें आहे. १८९० सालीं एका स्त्रीनें आपली सविस्तर डायरी पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली होती. त्या स्त्रीनें आपल्या आयुष्यांत नानाविध कला संपादन केल्या होत्या. एखादा कलावान पुरुष ज्याप्रमाणें केवळ कलेसाठीं कलेवर प्रेम करतो, त्याप्रमाणें त्या स्त्रीचें स्वतःच्या व्यक्तिनिष्ठ आयुष्यावरच सर्व प्रेम होतें. आपल्या आयुष्यांत स्वतःखेरीज दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीवर आपण प्रेम केलें नाहीं, असें तिनें कबूल केलें आहे. त्या डायरीवर एका शिष्ट मासिकानें अभिप्राय लिहितांना असा शेरा मारला कीं, त्या स्त्रीच्या अंगचे व्यक्तिनिष्ठ विविध गुण स्तुत्य आहेतच, परंतु तिला 'स्त्री' म्हणायला तयार नाहीं ! हें पुरुषीं वळण आहे. विवाहाखेरीज, आपल्या आयुष्याची नदी कोणातरी पुरु-

यांच्या आयुष्याला मिळाल्याखेरीज स्त्रीला-पूर्णत्व नाहीं. म्हणून हें व्यक्तिनिष्ठ आयुष्य स्त्रीच्या जातीला शोभत नाहीं. नवर त्या स्त्रीचें कलासंपन्न आयुष्य व्यर्थ आहे! आपल्याकडील स्त्री लेखिकांच्या लिखाणांतून अद्यापही ही परपुष्टतेंत पूर्णत्व मानणारी वृत्ति डोकावतें. स्त्रियांच्या गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें पहा! 'माझें बाळ तें' या कादंबरींत जवळ जवळ वरील संपादक महाशयांच्याच वृत्तीची री ओढली आहे. परंतु वरील अभिप्राय १८९० सालचा आहे आणि ही कादंबरी १९२५ नंतरची आहे!! स्वतंत्र व्यक्तिनिष्ठ जीवनाची कल्पना स्त्रीलेखिकांनाही अद्याप अप्रिय आहे हा शतकानुशतकें चाललेल्या एकांगी समाजपद्धतीचा परिणाम होय! गुलामगिरींतून मुक्तता होण्यापेक्षां गुलामगिरीची जाणीव होणें हें अत्यंत महत्वाचें आहे. ही जाणीव इब्सेनच्या सांप्रदायानें त्या समाजांत जागृत केली. म्हणून इब्सेनच्या ग्रंथांचा परिचय हा एक उद्बोधक सामाजिक अभ्यास होईल अशी लेखकाची दृढ श्रद्धा आहे. पुढील लेखांकांत इब्सेनच्या नाटकांपैकीं कांहीं प्रमुख सामाजिक नाटकाचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

---

# एक सामाजिक नाटक "घोस्ट" : ३

" A woman cannot be hereslf in the civilization of to-day; it is an exclusively male civilization with laws formed by the men and every woman's conduct is judged from the masculine stand-point. "

—*H. Ibsen.*

या लेखांकांत इब्सेनच्या 'घोस्ट' या नाटकाचा विचार करावयाचा आहे. समाजांत प्रचलित असे आचार 'शास्त्र' 'रूढी' या संभावित नांवांखालीं शतकानुशतकें चाललेले असतात. गतानुगतिक असा बहुजनसमाज 'वाडवडिलांच्या पावलावर पाऊल ठेवण्याच्या' वेडानें इतका नादान बनलेला असतो कीं, त्यासाठीं

हजारों अधर्म, अनीति, अन्याय डोळ्यांसमोर चालत असले, मनांत डांचत असले तरी ते 'शास्त्र' या नांवाखालीं चाललेलेच असतात. त्या समाजांतील उदयोन्मुख तरुण पिढीला या शास्त्राचाराच्या हट्टापायीं होणारा भयंकर अनर्थ जगाच्या जाणिवेबरोबर उघड उघड दिसत असतो आणि तें असह्य होत जातें ! या अधर्ममूलक आचारधर्माच्या लाटेंतच आपणही पडणार ही कल्पनाही त्याला सहन होत नाहीं. परंतु पूर्वापार चालत आलेल्या प्रवाहाचें त्याच्यावर इतकें जबरदस्त दडपण असतें कीं, तोही त्याच प्रवाहांत मागून लोटला जातो. व तारुण्यात अन्यायाची चीड येणारे तरुण उतार वयांत निर्विकार मनानें प्रवाहपतितासारखे जगूं लागतात. त्यांनाही या अन्यायाचें कांहीं वाटेनासें होतें. सामाजिक इभ्रतीची लांच खाऊन तेही शिष्टसांप्रदायांत सामील होतात. बी. ए. पर्यंत स्वाभिमान, आत्मविश्वास, व्यक्तिस्वातंत्र्य, या कल्पनांनीं फुगलेला प्रत्येक तरुण मध्यम वयांत एखाद्या 'साहेबापुढें' गोगलगाय बनून साहेबाचीं पोरेंबाळें व 'मंडई' करतांना दिसतो, तेव्हां आपणास आश्चर्य वाटतें कीं कोणाचें फट् म्हणून न घेणारा हाच का तो ! अन्यायाच्या प्रथम परिचयांत त्याविषयीं चीड प्रत्येकाला—प्रत्येक जिवंत माणसाला तरी असतेच, परंतु ती चीड अन्यायाच्या परिचयाबरोबर कायम ठेवणें हेंच जिवंतपणाचें लक्षण आहे. नाहींतर अन्यायाच्या परिचयाबरोबर अन्यायाचे कांटे बोथट होत जातात व एरव्हीं खरबरीत लागणाऱ्या कांबळ्यावरच झोपेनें घेरलेला माणूस शांतपणें घोरत पडतो तसें होतें. म्हणून एकाच समाजांत आगरकरासारखा एकादाच अन्यायाविरुद्ध झुंज करीत राहतांना स्वतःचा

देह झिजवितो व त्याच समाजांत आगरकरांचे छळवादी असतात! अन्यायाची जाणीव प्रत्येकाला केव्हां तरी होते, पण ती तितकी तीव्र राहते मात्र फार थोड्यांची!

अंगवळणी पडल्यामुळें बोथट होत चाललेली अनीतीची जाणीव जागृत करण्यासाठीं इब्सेननें असिधाराव्रत स्वीकारलें! नुसती टीका व शिव्या याचा भडिमार करून समाजसुधारणा होत नाहीं. उलट नाठाळ गुरासारखा समाज बिथरतो मात्र आणि समाजसुधारक उपहासास पात्र ठरतो. कारण स्वतःला मधून मधून बोचत असलेले अनाचार शक्य तोंवर डोळ्यांआड करण्याची समाजाची प्रवृत्ति असते. अशा वेळीं समाजाला आपल्या पापांसमोर उभें करून पापांची जाणीव देण्याचें काम समाजाला चुचकारून करावें लागतें. प्रचलित अशाच रूढ आचारांवरील दुभ्रतीचा बुरखा फाडून काढून अनीतीचें यथार्थ दर्शन घडवून, न बोलतां न सवरतां समाजाला त्या अनीतीची किळस व शिसारी आणावयाचें कुशल कार्य इब्सेननें केलें. त्याच्या नाटकांतील सृष्टि ही सगळ्यांच्या परिचयाचीच असते. त्यानें सामाजिक सुधारणेच्या मनोराज्याच्या तंद्रींत अकटो विकटो चित्रें रंगवलीं असतीं तर एक वेळ 'कवी' म्हणून त्याला मान मिळाला असता! पण समाजावर त्याच्या ग्रंथाचा कांहीं परिणाम झाला नसता.

चर्चेसाठी निवडलेल्या नाटकांत आपणास हेंच दिसून येईल. या नाटकात शिष्टसंमत अशा विवाहाचें वास्तव स्वरूप इब्सेननें दाखविलें आहे.

'घोस्ट' या नाटकांतील नायक मि. ॲलविंग यांचा शास्त्रोक्त पद्धतीनें एका स्त्रीशीं विवाह झालेला असतो व त्यांच्या विवाहाच्या

वेळचे धर्मगुरू मि. मँडर्स हे त्या जोडप्याचे जिवलग स्नेही असतात. मि. ॲलविंग यांचा विवाह अगदीं 'हिंदु' पद्धतीप्रमाणें झालेला आहे. वर म्हणून निवडलेला तरुण चांगला गोरागोमटा, धनाढ्य असा आहे. आणि वधूच्या नातलगांनींच त्याला पसंत केला आहे. यापलीकडे वराविषयीं कोणालाही कांहीं माहिती नसते. इकडून तिकडून गोळा केलेल्या माहितीवरून पसंत केलेल्या या वराशीं मि. ॲलविंगशीं, वधूची जन्माची गांठ घालून देण्याचें पवित्र धर्मकृत्य मि. मँडर्स या धर्मगुरूनें केलेलें असतें. धर्ममंत्रांची आरडाओरड व धर्मविधीचा फार्स केला म्हणजे वधूवरांवर मंत्रित पाणी शिंपडल्यासारखे ते एकरूप होतात व धर्मगुरूंच्या आशिर्वादानें कोणचेही दोन स्त्री–पुरुष विवाहांत यशस्वी होतात असा मि. मँडर्स यांचा प्रामाणिक समज असतो. परंतु आगीला पाणी म्हटल्यानें आगीचे धर्म बदलून तेथें पाण्याचा थंडपणा येत नाहीं. त्याचप्रमाणें वैवाहिक धर्माचाराचें मंतरलेलें पाणी शिंपडून मि. ॲलविंग यांच्या स्वभावांत कांहीं बदल झाला नाहीं. कथानकाची सुरवात मि. ॲलविंग यांच्या १० व्या पुण्यतिथीच्या वेळेस झाली आहे. आपल्या पतीचें स्मारक करण्यासाठीं मिसेस् ॲलविंग इनें मि. मँडर्सच्या मदतीनें एक ऑर्फनेज उघडावयाचें ठरवलें असतें. त्याप्रसंगीं मि. ॲलविंगचा मुलगा ओसवाल्ड हा घरीं आलेला असतो. तो दोन वर्षांनें घरीं आल्याबद्दल मि. मँडर्स त्याचें अभिनंदन करून आनंद प्रदर्शित करतात. संभाषणाच्या ओघांत ओसवाल्ड आपली 'घर' या शब्दाची व्याख्या सांगतो कीं, "घर म्हणजे काय हो! एक बाप व त्याच्या मुलांची आई मुलांसह जेथें एकत्र राहतात तें घर! मुलांची आई

म्हणजे ती धर्मविहित पत्नीच असेल असें नाहीं." हा गर्भितार्थ त्या धर्मगुरूस सहन होत नाहीं. त्या भटजीला कल्पनाही नसते कीं, धर्मविहित पत्नीखेरीज मुलांची आई कोणी निराळीच असते! आणि ही अनीति असलीच तरी निदान इतक्या राजरोस चालते हें तर त्यास विचार अशक्य वाटतें. 'वधू' व 'वर' नांवाच्या दोन व्यक्तींचे विवाह लावून जोडया जमवायच्या व धर्ममंत्राच्या जलसिंचनानें त्या जोडयावर डाग देऊन पक्क्या करावयाच्या एवढेंच त्याला माहीत! 'सावधान' म्हणून विवाह लावल्यानंतर त्या वधूवरांचें काय होतें हें पाहण्याची जबाबदारी त्याच्यावर पडत नाहींच! त्यामुळें विवाहांत होणाऱ्या राजरोस अनीतीची त्याला कल्पनाही नसते. परंतु ओसवाल्डनें उघडया डोळयानें जग पाहिलेलें असतें. विवाहबंधनांना झुगारून पत्नीखेरीज इतर स्त्रियांशीं संसार करणारीं कुटुंबें पाहिल्याचे दाखले ऐकून बिचारा धर्मगुरु गडबडतो! मिसेस् ॲलविंगला तो सांगतो कीं, "तुम्ही पोराला घरापासून दूर परगांवीं ठेवलेंत म्हणून तो बिघडला. त्याच्या या विचित्र कल्पना हा सगळा गृहशिक्षणाच्या अभावाचा परिणाम." त्या वेळीं मिसेस् ॲलविंग स्वानुभवानें त्या धर्मगुरूची 'धर्मी' ची धुंद उतरविते. मुलगा सांगतो त्यात काय चूक आहे असें ती धर्मगुरूलाच विचारते. धर्मगुरू मि. मॅंडर्स मिसेस् ॲलविंगला म्हणतात—"उद्यां तुमच्या पतीची दहावी पुण्यतिथी आहे. आणि आज मी तुम्हांला तुमचा एक मित्र म्हणून नव्हे तर जो तुमच्या आयुष्याच्या महत्त्वाच्या प्रसंगीं हजर होता तो धर्मगुरू म्हणून मी तुमच्यापुढें उभा आहें. आणि आज मी तुम्हांला कांहीं गोष्टी सांगणार आहें." धर्मगुरू पुढें म्हणतात " मिसेस् ॲलविंग,

तुम्हांला आठवत असेल की, तुमचा विवाह झाल्यानंतर एक वर्षानें तुम्ही स्वतःचा अधःपात करण्याच्या बेतांत होतां." "कोणचा तो अधःपात?" "तुम्ही आपल्या पतीचें घर सोडून बाहेर पडलां होतां. आणि पतीनें तुमची कितीही समजूत केली तरी तुम्ही परत जावयास तयार नव्हतां."

"विवाहानंतरच्या पहिल्यां वर्षांत मी किती भयंकर यातना सहन केल्या, याची तुम्हांस कल्पना आहे काय?"

धर्मसंमत विवाहांत पत्नीचें असमाधान असावें हें धर्मगुरूला अशक्यच वाटलें. तो म्हणतो, "तुमचें असमाधान म्हणजे ऐहिक सुखाबद्दल तुमची लालसाच नव्हे काय? सुखावर तुमचा काय अधिकार आहे? आपण आपलें कर्तव्य करावें एवढेंच; आणि तुमचें कर्तव्य म्हणजे तुम्ही निवडलेल्या व तुम्ही ज्याच्याशीं पवित्र करार केला आहे, त्या पतीची नेहमीं सेवा करीत राहणें हाच होय." चुलींतलें लांकूड चुलींतच जळालें पाहिजे हीच हिंदु विचारसरणी त्या धर्मगुरूची आहे. स्त्रियांना भावना असतात आणि ऐहिक सुखाची इच्छा असते हें आम्हांला कबूलच नाही. मिसेस् ॲलविंगनें आपल्या विवाहित आयुष्याचें रौद्र स्वरूप नंतर त्या धर्ममार्तंडाला सांगितलें आहे कीं, "माझे पति मी निवडलेले नव्हते! माझे पति कसें आयुष्य घालवीत होते हें तुम्हाला कसें कळणार! किती भयंकर अनाचार ते करीत होते, हें तुम्हाला माहीत आहे काय!"

"होय, त्यांच्या वर्तमानाविषयीं कांहीं गोष्टी मला कळल्या व त्या खऱ्या असल्या व वाईटही असल्या तरी पत्नीनें त्या गोष्टींचें बरें वाईट स्वरूप ठरविण्याचा तिला अधिकार नाहीं. पत्नीनें नवऱ्याचें

न्यायाधिशत्व घेणें योग्य नाहीं. नवऱ्याच्या वर्तनाचा विचार करण्याचा पत्नीला काय अधिकार? देवब्राह्मणांनीं व धर्मानें तुम्हाला दाखवून दिलेल्या व्यक्तीची डोळे झांकून मुकाटयानें पूजा करावयाची एवढेंच तुमचें काम! तुम्हीं स्वतःच्या नांवाला काळिमा आणलात आणि दुसऱ्याचीही इभ्रत धोक्यांत घालीत होतां!"

पतीच्या अनीतिमान् वर्तनाचा तिरस्कार करण्यांत पत्नीला कलंक लागतो कीं ती अनीति मुकाट्यानें सहन करण्यांत अधःपात होतो? ज्या धर्मगुरुनें आपली या अनीतिमान् बेजबाबदार माणसाशीं गांठ घालून दिली, त्या धर्मगुरुकडेच मिसेस् ॲलविंग घरांतून निघून गेली होती. त्याबरोबर त्या धर्मगुरूचें स्थान डळमळूं लागलें आणि आपली इभ्रत बचावण्यासाठीं त्यानें प्रचंड खटपटीनें चुलींतलें लांकूड पुन्हां चुलींत घांतलें! मिसेस् ॲलविंगच्या विवाहसंबंधाचा उखडलेला डाग पुन्हां जोडून दिला! आणि धर्मगुरू म्हणतात, "मी तुम्हाला तुमच्या अविचारापासून परावृत्त करून पुन्हां सासरीं पोचविल्यानंतर तुमचे दिवस सुखाचे गेले नाहींत काय? मी हें एक मोठें धर्मकृत्य ईश्वरी प्रेरणेनेंच केलें!" मिसेस् ॲलविंगनें आपल्या विवाहित आयुष्याची इतक्या दिवस इभ्रतीसाठीं मनांत ठेवलेली हकीकत पुढें सांगितली. "मला पुन्हां त्या बेजबाबदार माणसाच्या घरांत लोटून दिल्यानंतर तुम्ही पुन्हा कधीं कधींसुद्धां आलांही नाहीत. मरेपर्यंत माझे पति अगदीं होते तसेच स्वच्छंदी होते. उद्यां त्यांचें मी स्मारक करणार आहें, परंतु त्या स्मारकाच्या प्रसंगीं मी एक शब्दही बोलणार नाहीं"! शास्त्रसंमत विवाहाचा हा पराभव ऐकून धर्मगुरू थंड पडत चालले होते. मि. ॲलविंगनें आपल्या विवाहबंधनाच्या धार्मिक पावित्र्याची कधींच फिकीर केली नाहीं. या धार्मिक बंधनांत मिसेस्

ॲलविंगचा सारखा कोंडमारा होत होता. ऑस्वाल्डचा जन्म झाल्या नंतर मुलाला बापाच्या नालायकीची जाणीवसुद्धां होऊं नये ही एक नवीन जबाबदारी तिच्यावर पडली होती. घराबाहेर मि. ॲलविंगचे अनाचार चाललेच होते. परंतु शेवटीं घरातही या अनाचारांचा वास मिसेस् ॲलविंगला येऊं लागला. एक दिवस आपल्या पतीच्या बसावयाच्या शेजारच्या खोलींत कांहीं कामानिमित्त गेली असतां मिसेस् ॲलविंगला आपल्या दासींचे शब्द ऐकूं आले. " ॲलविंग, सोडा मला. मला जाऊं द्या. " आपण ज्याच्यासाठीं इतके अन्याय मुकाट्यानें सहन करीत आहोंत तो आपला पति प्रत्यक्ष एका मोल-करणीशीं पापकर्म करीत असल्याचें ऐकून मिसेस् ॲलविंगला काय वाटलें असेल ! परंतु जगांतली कोणतीही शक्ति मि. ॲलविंगला त्याच्या कृत्याबद्दल जाब विचारण्यास समर्थ नव्हती. पति या भूमि-केवर मि. ॲलविंग इतका सुरक्षित व अनियंत्रित स्वातंत्र्य उपभोगित होता कीं, वाटेल ते अन्याय केले, धर्मबंधनें पायाखालीं तुडवलीं, तरी कोणी ब्रहीं काढणें शक्य नव्हतें. उलट इभ्रत या नांवाखालीं या अनाचारांवर पांघरूण घालीत रहाणें हेंच तिचें कर्तव्य अशी मिसेस् ॲलविंगला धर्माज्ञा होती ! जगांतली कोणतीही शक्ति तिचें या आगींतून संरक्षण करूं शकत नव्हती. पदोपदीं ढांसळत चाललेला संसार आवरून धरीत मिसेस् ॲलविंग प्रयत्नाची पराकाष्ठा करीत होती. मि. ॲलविंगला रात्रीचे वेळीं घरांत गुंतवण्यासाठीं व आपली अब्रू, आपलें सौभाग्य गटारानें लोळूं नये म्हणून, ती रात्रीच्या वेळीं नवरा दारू पीत असतां त्याला सोबत करीत बसे ! त्याच्या अर्वाच्य संभाषणांत तिला भाग घ्यावा लागत असे ! आणि त्याला निजवून ठेवण्यासाठीं त्याच्या निरोंतील पाशवी शक्तीशीं झुंजावें

लागत असे ! हा जुलूम व आपल्या संसाराचे धिंडवडे मुकाट्यानें सहन करणें याला जग पतिभक्ति म्हणत होतें. आपल्या मुलाचें आयुष्य एवढींच एक तिला समाधानाची जागा होती ! शेवटीं तिनें सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली ! आपल्या मुलाला तिनें घरापासून दूर ठेवलें ! त्या वेळीं ओसवाल्ड सात वर्षांचा होता आणि तो घरातले प्रकार पाहून उत्सुकतेनें आईला प्रश्न विचारूं लागला होता. सर्व मायापाश तोडून मिसेस् ॲलविंगनें त्याला घराबाहेर लोटलें ! त्या भ्रष्ट झालेल्या घराचा निदान त्याला तरी संसर्ग लागू नये हीच तिची तळमळ होती. आणि वडील जिवंत असेपर्यंत ओसवाल्ड कधींही घरीं येणार नाहीं अशी तिनें काळजी घेतली ! आपल्या नादान पतीमुळें घरादाराची व मुलाची वाताहात होऊं नये म्हणून तिनें सर्व मालमत्तेची व्यवस्था हातीं घेतली ! मि. ॲलविंगला आपल्या पत्नीला एक शब्दानेंही अडवण्याचें मनोधैर्य नव्हतें ! आणि अशा नालायक पतीचेंच स्मारक करतांना त्या पत्नीला पाहून त्या धर्मगुरूला आश्चर्य वाटलें ! त्यावेळीं मिसेस् ॲलविंग सांगते कीं, " अनीतीनें भ्रष्ट झालेल्या संपत्तींतला एक छदामहि माझ्या मुलाला मिळूं नये म्हणून मी ते सर्व पैसे या स्मारकांत घालीत आहें ! आणि पुन्हां माझ्या घरांतल्या अनाचाराचा सुगावा कोणास लागूं नये म्हणून मी हें स्मारकाचें नाटक करीत आहें ! उद्यां हें स्मारक उभारलें कीं, मला अगदीं शांत वाटेल. माझा मृत पति या घरांत एकदां जिवंत होता, हीहि आठवण नाहींशी होईल ! मी व माझा ओसवाल्ड एवढीं दोघेंच या घरांत राहूं " !

ही मिसेस् ॲलविंगची हकीगत इब्सेनच्या भोंवतालच्या समाजापेक्षां आपल्याच समाजस्थितीची जास्त निदर्शक आहे ! आणि

इब्सेनने दाखवला धर्मगुरु हा एक व्यक्ती नसून रूढीच्या वेडानें हजारो अन्याय पचवणारा प्रचंड समाज त्यांत प्रतिबिंबित झाला आहे !

मिसेस् ॲलविंगनें घरांतील अनाचारापासून ओसवाल्डला दूर ठेवला होता. परंतु तोसुद्धां वडिलांच्याच वळणावर गेला. लहानपणीं त्याच्या वडिलांनीं त्याला प्रेमभरानें (?) सिगारेटस् ओढायला शिकवल्या होत्या ! आणि शेवटीं वडिलांनीं ज्या मोलकरणीशीं पापकर्म केलें, त्या मोलकरणीच्या मुलीविषयीं ओसवाल्ड स्वतः आसक्ति बाळगीत होता ! मिसेस् ॲलविंगच्या आयुष्याची जिवंत-पणींच राख होत होती ! आणि पुन्हां हें सर्व धर्मसंमत, शास्त्रसंमत व शिष्टसंमत होतें ! मि. ॲलविंगइतकी अनियंत्रित सत्ता हिंदुस्थानां-तीलही पतिवर्गाला आहे ! आणि मिसेस् ॲलविंगसारख्या पतीच्या अनाचाराच्या भक्ष्यस्थानीं पडणाऱ्या स्त्रिया या देशांत तर कितीतरी आहेत ! कारण येथें तर विवाह ही पुरुषवर्गाची एक जन्मसिद्ध सत्ता आहे ! मि. मॅंडर्ससारखेच आमचेही धर्मगुरू वैवाहिक अन्यायाविषयीं बेफिकीर आहेत ! धर्मगुरू पुढें म्हणतातः—" याबद्दल कोणाला दोष देणार ? करतांना सर्व विधि यथासांग झाले होते ना ? " परंतु मिसेस् ॲलविंगचा या पोकळ शब्दांवरचा विश्वास उडाला होता ! ती म्हणते " माझ्या पतीच्या अनाचाराची ओरड करण्याचें मला धैर्य नव्हतें म्हणूनच मी हा छळ सहन केला ! मी त्याला सोडलें असतें तर लोकांनीं माझाच छळ केला असता ! ओसवाल्डला पितृप्रेमाबद्दल मी काय शिकवावें ? या पोकळ शब्दांवर माझी मुळींच श्रद्धा नाहीं. मला पुरेसें धैर्य असतें तर मी ओसवाल्डला जवळ घेऊन सांगितलें असतें—' ओसवाल्ड, तुझा बाप असा नादान दारुडा आहे ! ' परतु त्याला मी वडिलांविषयीं खोट्याच गोष्टी

सांगत होतें! वास्तविक त्याला मि. ॲलविंगविषयीं काय म्हणून आदर वाटावा? ओसवाल्डचें—रेजिनावर—माझ्या मोलकरणीच्या मुलीवर प्रेम आहे. परंतु मला पुरेसें धैर्य असतें तर मी ओसवाल्डला सांगितलें असतें कीं "ओसवाल्ड, खुशाल रेजिनाशीं विवाह करून सुखी हो!" इभ्रत ही एक कधींही अस्तित्वांत नसलेली लौकिक समजूत आहे! इभ्रत म्हणजे अन्यायाखालीं निमूटपणें चिरडलें जाणें! परंतु मी हें करूं शकत नाहीं. मला कोणी भूत मागें ओढतें असें वाटतें. रूढ समजुतीचीं भूतें आपल्या सर्वांच्या मानगुटीं बसलीं आहेत. मृत कल्पना व आचार आपला गळा सोडीत नाहींत! त्या आचारांच्या रूपानें आपलें वाडवडील भूतयोनींत आपला छळ करीत आहेत! आणि तुम्हीच मला हा अनुभव आणून दिलात! माझें कर्तव्य व पतिभक्ति—पतिव्रताधर्म या कल्पनांच्या भूतांनीं पछाडले जाऊन तुम्ही मला या वैवाहिक दावणीशीं जखडून टाकलेंत आणि मग मला या पोकळ समजुतीचें रौद्र स्वरूप दिसलें! विवाह ही एक यंत्ररचना आहे हें मला कळलें! धर्म या नांवाखालीं धर्मगुरू म्हणून तुम्ही आपल्याही आयुष्याचा अधःपात केला आहे! मला पतीची कधींही ओळख झाली नाहीं! त्यांनाही माझी कधीं ओळख पटली नाहीं! माझ्या भोवतीं लौकिकसमजुतीचीं भूतें गराडा घालीत होतीं. पत्नी म्हणून नव्हे, धर्म म्हणून नव्हे तर त्या भूतांनीं माझा कोंडमारा केला म्हणून मी मि. ॲलविंगबरोबर घरांत जखडलें गेलें होतें!"

हजारों धर्मविधींचें नेतृत्व स्वीकारणाऱ्या धर्ममार्तंड मि. मॅंडर्सला ही कथा ऐकून अंगावर शहारे येतात. लहान मुलांना आपल्या बऱ्या वाईट कृत्यांचा परिणाम कळत नाहीं! त्याचप्रमाणें हा धर्म-

मार्तंडही अज्ञानी होता आणि मिसेस् ॲलविंग त्याला 'तूं एक मोठें मूल आहेस' असें म्हणते तें योग्यच आहे! भोंवतालच्या जगाकडे डोळेझांक करून केवळ वयानें वाढणारे धर्मगुरूही 'मोठीं मुलेंच' नव्हत तर काय!

या 'मोठ्या मुलां'नीं विवाहविधीनें केलेले पोरखेळ येथेंच संपले नाहींत! निदान ओसवाल्डच्या तरी आयुष्याचें मातेरें होऊं नये म्हणून मिसेस् ॲलविंगनें पराकाष्टेचे प्रयत्न केले. परंतु बापाच्या दुष्कृत्यापासून ओसवाल्डचा बचाव झाला नाहीं. शेवटीं ओसवाल्ड-च्या आयुष्याची कींव येऊन निदान त्याला मानसिक यातना तरी होऊं नयेत म्हणून शेवटीं त्याची आई आपल्या हातानें त्याला दारूचे पेले भरून देते!

"घोस्ट" या नाटकांतील मुख्य विचारसरणी साधारणतः अशी आहे! सर्व नाटक वाचल्यानंतर आपण आपल्या भोंवतालीं जरा जागे होऊन पाहूं लागलों तर या 'घोस्ट'चीं भुतें आपणास सर्वत्र दिसतील! ज्याला 'पतिभक्ति' म्हणतात ती पतिभक्ति नसून रूढीच्या बंधनांनीं जखडल्या गेलेल्या अगतिक स्त्रियांचा आत्मयज्ञ—आत्म-हत्या आहे! मेलेला माणूस शांत झोंपला आहे या म्हणण्याइतका तीव्र उपहास त्या 'पतिभक्ती'च्या गौरवांत भरलेला आहे! मिसेस् ॲलविंगनें कोणत्या अपराधाबद्दल हा जुलूम सहन करावा याचें उत्तर आपणास देतां येणार नाहीं! आणि समाजांतलीं 'मोठीं मुलें' धर्म, रिवाज, इभ्रत या नांवाखालीं किती क्रूरक्रीडा करीत आहेत हें पाहून आपली विचारशक्ति बधिर होते!

'डॉल्स् हाऊस' या नाटकाचें पुढील लेखांत विवेचन केल्यावर आपणास याच्या पुढची पायरी दिसेल! अन्याय असह्य होऊन, आपल्या आयुष्याचा हा पोरखेळ पाहून चीड येऊन त्या नायिकेनें 'सुखाशेसह संसाराला' रामराम ठोकलेला दिसेल! आणि तेथेंही हाच प्रश्न आपणास डंवचीत राहील कीं, दोष कोणाचा?

---

# डॉलस् हाऊस : : : ४

"Truth is stranger than fiction."

या नाटकाचे तीन अंक म्हणजे एका संसाराच्या तीन अवस्थाच आहेत. आणि त्या अवस्थांच्या कक्षेंत संसाराच्या विविध स्वरुपाचें किंबहुना विविध स्वरुपाच्या सर्व संसाराचें संकीर्ण समालोचन इब्सेननें केलें आहे. रूढीप्रिय असा नाठाळ समाज ज्यावेळीं कांहीं सत्यें कळलीं तरी डोळ्याआड करण्याचा अट्टाहास करतो, त्यावेळीं तीं सत्यें समाजाच्या विवेकबुद्धीवर आघात करून एकादां सत्यशोधक समाजाला तीं सत्यें पहावयास भाग पाडतो त्यावेळीं समाज आश्चर्यानें थक्क होऊन म्हणूं लागतो कीं,

"Truth is stranger than fiction."

इब्सेन सारख्यांचें वाङ्मय Fiction म्हणण्यापेक्षां Truth होतें. आणि Fiction चें जें कोडकौतुक होतें तसें Truth चें होत नाहीं!

'डॉलम् हाऊस' मधील नायिका नोरा व नायक हेल्मर हे पहिल्या अंकाच्या सुरवातीस अत्यंत यशस्वी दंपती म्हणून पुढें येतात. 'नोरा' ही अगदीं 'हिंदु' जातीची पतिनिष्ठ पत्नि आहे. हेल्मरच्या आयुष्याच्या बाहेर तिला स्वतंत्र आयुष्यच नाहीं. स्वतःच्या आयुष्याचें नोरासारख्या पत्नीनें केलेलें आत्मसंतर्पण वा आत्मयज्ञ पाहिला कीं, एका वेळेस त्यांच्याविषयीं आदर व दुसऱ्या वेळेस कींव वाटते. फारशी चिकित्सा न करतां जवळ असेल त्या खांबावर किंवा वृक्षावर विश्वस्त होऊन त्याला कुरवाळणारी एकादी वेल असते तशीं कांहींशी अवस्था या नायिकेची असते आणि त्यामुळें विवाह-हेतु पराभूत झाला व अद्वैताचे तुकडे झाले कीं, शेवटीं पत्नीच निराधार होते व पतीची भूमिका अचल वाटते. सर्व आयुष्याचा होम करून पुन्हां शेवटीं पतिनिष्ठ पत्नीलाच विवाहभंगाचे तीव्र तडाखे बसतात. हें पाश्चात्य समाजांतही दिसतें !

आपल्या विवाहापासून हेल्मरनें अत्यंत हालांत दिवस काढले होते व नोरा व हेल्मर एकमेकांच्या जिवास जीव देऊन मायेच्या पायरीवर पोहोंचलेल्या प्रेमानें सर्व संकटांतून वाट काढीत होतीं. ते दिवस संपून त्यांना जरा बरे दिवस आले होते व आपल्या पतीच्या वैभवांत नोरा आपलें सर्वस्व विसरून गेली होती. जरा सुखाचे दिवस आले म्हणून नोरानें येता नाताळ अगदीं आनंदानें साजरा करावयाचा ठरवला होता व बाजारांतून तिनें कांहीं सुंदर वस्तु खरेदी केल्या होत्या. त्या वस्तू पाहून हेल्मरला आनंद व्हावा हाच तिच्या आनं-दाचा उत्कर्ष होता. हेल्मरनेंही आपल्या पत्नीनें हा थोडासा जादा

खर्च केल्याबद्दल राग न मानतां तोहि तिच्या आनंदांत सामील झाला. प्रामाणिक श्रमानें मिळालेल्या मीठ भाकरींत स्वर्गीय सुख उपभोगणाऱ्यां या सुखी दंपतीबद्दल प्रथमदर्शनीं आपणास अभिमान वाटतो.

अद्वैतं सुखदुःखयोरनुगतं सर्वास्ववस्थासु यत् । हें भवभूतीचें यशस्वी विवाहाचें चित्र सत्य वाटूं लागतें. हेल्मर नोराला म्हणतो–"नोरा, आतां बिलकूल कर्ज करायचें नाहीं अं! कर्ज काढून आपल्याला घर सजवावयाचें नाहीं. आपण इतके दिवस अडचणींतून नेटानें काढलें नाहीं का? आणखी थोडे दिवस काढूं. पण बघ, अशी लगेच उदास होऊं नकोस. हीं पहा आपल्या मुलांसाठीं खेळणीं आणलीं आहेत. आणि आपल्या मोलकरणींसाठींसुद्धां नवे कपडे आणले आहेत. तिलासुद्धां सणाचें कांहींतरी नवें नको का!"

नोरानें मात्र आपल्या पतीसाठीं बाजारांतून आणलेली प्रिय वस्तू दाखवली नाहीं. नाताळच्या दिवशीं रात्रीं आपण ती 'जम्मत' दाखवून त्याला थक्क करूं यांत तिला जास्त आनंद होता. हेल्मर तिच्या उधळेपणाबद्दल तिची विनोदानें थट्टा करतो...... "...हं. माझ्याकडे अशी सरळ पहा. आतां माझा शब्द न मोडण्याचें तूं वचन दिलें आहेस अं?–नोरा, गेला नाताळ तुला आठवतो का! नाताळच्या सणाची तयारी करण्यासाठीं तूं तीन आठवडेपर्यंत स्वत:ला खोलींत कोंडून घेऊन काम करीत होतीस. पण आपलें कष्टाचे दिवस संपलेत. आतां तुला हात दुखेपर्यंत आणि डोळ्यांतून पाणी येईपर्यंत काम करण्याची कांहीं जरूर नाहीं."

या संभाषणांत नोरा व हेल्मर ही दोघें किती सुखासमाधानानें दिवस काढीत होतीं हें सहज कळतें. आपल्या परिचयाच्या मिसेस्

लिंडला आपली हकीकत सांगतांना नोरा सांगते: “ आतां हेल्मरची न्यूयॉर्क बँकेवर नेमणूक होणार आहे आणि त्याला आतां मोठा पगार होणार आहे. आतां आम्ही मन मानेल तसें वागूं शकूं. संकटांनीं भारावलेलें माझें मन किती हलकें झालें आहे ! पुष्कळ पैसे आणि अगदीं निष्काळजी जीव. नोरा लहानपणापासून इतकी कांहीं उधळी राहिली नाहीं. आम्हांला उधळण्याइतके पैसेच कोठें मिळत होते. आणि पूर्वीपेक्षां त्याला जास्त पैसे मिळवणें जरूर होतें. विवाहाच्या पहिल्या वर्षीं हेल्मरनें किती भयंकर यातायात केली ! मिळेल त्या मार्गानें दिवसरात्र तो काम करीत होता, पण त्याला ते श्रम झेपले नाहींत. लवकरच त्याची प्रकृति ढांसळली आणि डॉक्टरनीं सांगितलें, त्याला हवा बदलण्यासाठीं कोठें तरी जाणें अगदीं जरूर आहे. त्यावेळीं आमच्या छोट्या इव्हरचा जन्म झाला होता. इटलीमध्यें आम्हीं एक वर्ष काढलें आणि तें किती सुखानें काढलें म्हणून सांगूं ? पण त्या ट्रिपसाठीं भयंकर पैसा लागला. परंतु हेल्मरच्या आयुष्यापुढें मला कशाचीही किंमत नव्हती. हेल्मर आजारी होता त्यावेळीं इव्हरच्या जन्माचा काळ जवळ येत होता. मला माझ्या हेल्मरची आजारीपणांत मनाजोगी सेवाही करतां येईना. माझे वडील त्यावेळीं हयात होते. त्यांनीं आम्हांला पैसे दिले व ते घेऊन मी हेल्मरला इटलींत घेऊन गेलें. त्याची प्रकृती लवकरच सुदृढ झाली. आतां पहा, आम्हीं व आमचीं गोंडस मुलें. क्रिस्ताइन्, क्रिस्ताइन्, किती आनंदाचे दिवस आलेत हे ! ” अशा रीतीनें नोरा अगदीं लहान बालकाच्या निर्व्याज मनोवृत्तीनें ज्या आपल्या मैत्रिणीला ही हकीकत सांगत होती ती क्रिस्ताइन् लिंड बिचारी दुर्दैवी विधवा होती. तिचें विवाहित आयुष्य नोराच्या अगदीं बरोबर

उलट होतें. आपल्या मृत पतीसाठीं दुःख करणेंसुद्धां तिच्या नशिबीं नव्हतें! (कारण त्याचा वियोग जाणवण्याइतकें सहवाससुख तिला कधींच मिळालें नव्हतें!) विवाहाच्या वेळीं तिची आई अंथरुणा-वर खिळलेली होती. तिच्या गरीब भावंडांना कोणाचाही आधार नव्हता. आणि गरिबींतली उपासमार वाचवण्यासाठीं तिला विवाहाची मागणी स्वीकारावी लागली! पतीची पुष्कळ इस्टेट असून तो गेल्याबरोबर तीन वर्षे मिसेस् लिंडला पोटासाठीं वणवण भटकावें लागलें! तिची म्हातारी आई वारली आणि मुलेंही मोठीं होऊन स्वावलंबी झालीं होतीं. आणि आपल्या एकट्याच्या पोटाला अन्न मिळवण्यासाठीं मिसेस् लिंड नोकरीच्या आशेनें नोराच्या घरीं आली होती. मिसेस् लिंड म्हणते, "माझें आयुष्य अगदीं भकास झालें आहे.–ज्याच्यासाठीं मला जगावेंसें वाटेल असें मला कोणीही राहिलें नाहीं. गतआयुष्याच्या स्मृतींनीं माझा पाठलाग चालवला आहे. आणि त्या यातनांतून माझें मन सोडवण्यासाठीं तें कोठेंतरी गुंतवावें म्हणून मी येथें आलें आहे!"

विवाहित आयुष्याची हीं दोन चित्रें नाटकाच्या सुरवातीलाच इब्सेननें दाखवलीं आहेत. नोरानें मिसेस् लिंडसाठीं कांहींतरी काम देण्याची हेल्मरला विनंती करण्याचें कबूल केलें! कारण नोराचा स्वभावच असा होता कीं, आपल्या आनंदांत, वैभवांत जितके वाटेकरी होतील तितका तिचा आनंद वाढत होता. आणि मिसेस् लिंडसाठीं खटपट करण्याचें तिनें आनंदानें कबूल केलें! आपण हेल्मरसाठीं प्राणसुद्धां द्यावयास तयार आहोंत तर मिसेस् लिंडला आपल्या पतीचा वियोग झाल्यावर दुःखही वाटत नाहीं ही संसाराचीं दोन चित्रें पाहून नोराला स्वतःच्या सुदैवाबद्दल थोडासा अभिमान

वाटल्यावांचून राहिला नाहीं! आपण आपल्या पतीसाठीं त्याच्या आजारीपणांत केवढें भयंकर धाडस केलें आहे हें सांगण्यांत तिला विलक्षण आनंद वाटत होता. तें धाडस आपल्या पतीसही तिनें सांगितलें नव्हतें. त्या धाडसाचा इतिहास नोरा सांगते.—" हेल्मरची व मंडळ्यांची अशी समजूत आहे कीं, आम्हांला इटलीस जाण्यासाठीं बाबांनीं पैसा दिला. पण खरें म्हणजे बाबांजवळ पैसाही नव्हता. मी स्वतःच ते पैसे मिळविलेत. २५० पौन्ड मी एकटीनें कोणालाही न कळवितां जमविले! कसे मिळविले असतील मी हें? क्रिस्ताइन् तुला सांगू का?" आणि नोरानें अगदीं जपून हळूच आपलें रहस्य फोडलें कीं, 'आपण ते पैसे कर्जाऊ काढले होते!' काय हें भयंकर धाडस? पत्नीनें पतीच्या संमतीखेरीज कर्ज काढावें आणि पुन्हां त्याला तें कधींच सांगूसुद्धां नये. केवढा हा अनाचार! पण नोराचें यापेक्षांही भयंकर धाडस होतें. आपल्या एका स्तुतिपाठकाकडून, सौन्दर्यभंग्याकडून तिनें हे पैसे मिळविले होते! बिचारी अजाण नोरा! आपण आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर, सौन्दर्याच्या जोरावर आपल्या पतीच्या आरोग्याचा मार्ग शोधून काढला, याबद्दल तिला कधींही कांहींतरी अनाचार केल्यासारखी रुखरुख सुद्धां वाटली नाहीं! आपल्या पतीचें आयुष्य वांचवणें यांत अनाचार कसा होतो हेंच तिला कळेना! मी असे पैसे मिळवून इटलीला जावयाची सिद्धता केली इतकी हेल्मरची प्रकृति बिघडली हें हेल्मरला कळवणें शक्यच नव्हतें! पण डॉक्टरनीं मला येऊन सांगितलें कीं, "हेल्मरचें आयुष्य धोक्यांत आहे." मीच हेल्मरजवळ स्वतःच्या हौशीसाठीं प्रवासाचा हट्ट धरला. मी रडलें, रुसलें, विनंति केली. मी त्याला कर्जसुद्धां काढायला सुचवलें! परंतु हेल्मरला ती कल्पनासुद्धां सहन

झाली नाहीं ! आणि माझ्या खुळचट हट्टाला दाद न देतां माझें संरक्षण करण्याची योग्य मार्ग दाखविण्याची जबाबदारी पार पाडण्याची त्याला जाणीव होती. हेल्मरजवळ ही युक्ति उपयोगी पडली नाहीं. परंतु हेल्मरला वांचवण्यासाठीं मी प्राणाहुति द्यावयास तयार होतें. हेल्मरसाठीं मी काय करायचें ठेवलें असतें ? आणि बाबांकडून पैसे आणले असें सांगून मी हे पैसे मिळविले."

नोराचे बाबाही लवकरच वारले व हें रहस्य हेल्मरला कळलेंच नाहीं. हेल्मरसारखा तीव्र स्वाभिमानी माणूस ! आपल्या पत्नीनें आपल्यावर कांहीं उपकार केले आहेत ही कल्पनाही त्याला सहन झाली नसती. आणि पति पत्नीच्या नैसर्गिक प्रेमसंबंधाचा, या कृत्यामुळें नाश झाला असता ही नोराला खात्री व भीति वाटत होती.

मग नोरा हेल्मरला हें केव्हां सांगणार होती ?

नोराच्या वरील कबुलींत त्यांच्या संसाराविषयीं आणखी एक कळून येतें कीं, पतिपत्नींतील हें अपूर्व ऐक्य व स्नेह नैसर्गिक नव्हतें. ही मैत्री नव्हती; हा तह होता.

हेल्मरच्या इच्छेबरहुकूम आपलें शरीर व मन वांकवायचें, इतकी व्यक्तित्वाची मोडणी करून नोरानें ही मैत्री टिकवली होती.— नाटकाच्या सुरवातीस हेल्मर प्रणयविनोदांत नोराला 'माझ्या बुलबुला ! माझ्या नादान कोकरा !' अशा नांवानें संबोधतो आहे. या विशिष्ट अभिधानांत हेल्मरचा अप्रतिहत 'नवरेपणा' व्यक्त होत आहे. बायका या बाहुल्याच आहेत, खेळणींच आहेत, मालकाला रंजवणाऱ्या मैना आहेत, हीच पत्नीपदाविषयींची हेल्मरची कल्पना यांत व्यक्त होते, व बिचारी नोरा ! हेल्मरच्या सुराला सूर मिळविण्यासाठीं स्वतःच्या जीवनाच्या तारा ती वाटेल तशी पिळीत होती

हेल्मरच्या आयुष्याशीं एकरूप होण्याची तिला ‘ संवय ’ झाली होती. व्यक्तिविशिष्ट असें तिला स्वतःला कांहींच नसल्यानें या ‘ हांजी हाजींत ’ व्यक्तित्वाचा केवढा होम होतो, याची तिला जाणीव होण्या-सारखा प्रसंगच आला नव्हता ! हेल्मरसाठींच आपण हे पैसे मिळ-विण्याचें धाडस केलें, परंतु पत्नीनें असें कांहीं तरी करावें यांत हेल्मरला, मित्रभावानें अशा पत्नीबद्दल अभिमान न वाटतां, उलट तिनें अनादर केला, अनाचार केला, आपणांस मिंधे केलें, असेंच हेल्मरला वाटलें असतें याची नोराला पुरेपूर जाणीव होती. आप-णांस जीवदान देणाऱ्या पत्नीबद्दल कृतज्ञता तर दूरच, पण पत्नीच्या हातून जीवदान घेण्यांत हेल्मरला अपमानच वाटला असता. त्या अपमानाच्या भरांत त्यानें क्षणार्धांत नोराचा त्याग केला असता ! तिला ‘ कुलटा ’ ठरवून घराबाहेरही हांकलली असती !

आणि शेवटीं बरोबर तसेंच झालें आहे !

नोरानें मनांत असें योजिलें होतें कीं, जेव्हां माझें सौन्दर्य म्हातार-पणीं विटून जाईल; तेव्हां हेल्मरला माझ्याविषयी आज वाटत आहे तितका तीव्र ओढा व प्रेम वाटणार नाहीं. हेल्मरला माझ्यामध्यें कांहींच आकर्षणीय वाटणार नाहीं, त्यावेळीं मजजवळ सांगण्या-सारखें कांहींतरी गोप्य असावें कीं, ज्यामुळें तरी निदान हेल्मरला माझ्याविषयीं कांहीं तरी प्रेम वाटेल !

या संबंधाला कोणी प्रेम म्हणावें ? कोण याला स्नेह म्हणेल ? कोण याला भक्ति म्हणेल ?

हेल्मरच्या व्यक्तित्वाला, स्वाभिमानाला चुकूनहि धक्का लागायचा अवकाश, त्या क्षणीं नोराची सेवा, कर्तव्यनिष्ठा, आत्मयज्ञ, आपलें व स्वतःचें कर्तव्य, विवाहबंधनाचें पावित्र्य, हें कांहींही लक्षांत न घेतां

हेल्मरनें तेथल्यातेथें नोराला विप मिनलेल्या करमळीसारखें कापून काढलें असतें ! नोराचें सौंदर्य निवून गेलें नाहीं तोंपर्यंतच हेल्मरला तिच्याविषयीं आसक्ति होती आणि शरीराचा पराभव झाल्यावर आपण निराश्रित होऊं नये म्हणून हें एक गौप्य नोरानें जिवाशीं जपून ठेवलें होतें. ज्या सौन्दर्यउपासकानें नोराला हे पैसे दिले होते, त्याच्या भेटी घेणें, त्याला खुष करणें वगैरे कामें करतांना नोराला किती मानसिक यातना झाल्या असतील ? आपल्या पतीचें प्राण वांचवण्यासाठीं कांहींही साधन जवळ उरलें नाहीं अशा असहाय्य स्थितींत शेवटीं तिनें आपल्या सौन्दर्याचा उपयोग करण्याची तयारी करावी हा लहानसहान आत्मयज्ञ खास नाहीं ! क्रॉगस्टॅड नांवाच्या एका व्यक्तिजवळून नोरानें हे पैसे मिळवले होते. त्याला तिला दर महिन्यास हते द्यावे लागत. परंतु हेल्मरच्या इभ्रतीस शोभेसा बडे-जाव ठेवतां ठेवतां नोराला मासिक हप्त्यापुरते पैसे जमविणें किती दुरापास्त होत होतें ! हेल्मर बरा झाला; वैभवास चढला, जगात त्याला नव्या आयुष्याबरोबर कीर्ति व संपत्तीही मिळाली. परंतु या त्याच्या पुनर्जन्मास कारण झालेली नोरा...तिनें मात्र आपल्या जिवास एक हृद्रोग लावून घेतला होता ! हेल्मर तिला कपड्यासाठीं वगैरे पैसे देत असे, त्यांतून ती अर्धेच खर्च करून अर्धे त्या कर्जातला हता म्हणून देत असे. कारण पतीला नकळत एका पुरुषाचे पैशाचे उपकार घ्यावयाचे म्हणजे नोराचें किती भयंकर साहस होतें ? व त्या आगींतून लवकर सुटल्याखेरीज हेल्मरच्या वैभवाच्या सुखांत तिला क्षणभरही भाग घेतां येत नव्हता ! साधेच कपडे वापरले तरी नोरा सुंदर दिसत असे. त्यामुळें हेल्मरला तिला असंतुष्ट करावें लागलें नाहीं ! पैसे जमविण्यासाठीं तिनें नकला कर-

ण्याचीं कामें मिळविलीं. पति बँकेंत हुद्याच्या जागेवर असताना हातीं पैसे खेळत असतां, पत्नीनें एका अडीचशें पौन्डासाठीं हमाली करावी हे काय प्रेमाचे कीं स्नेहाचे संबंध आहेत? हेल्मरला झोंप लागली कीं, नोरा गुपचीप आपल्या खोलीला आंतून कडी लावून घेऊन पहाटपर्यंत खर्डेघांशी करीत बसे! नोराला कधीं कधीं वाटावें, आपणावर एकादा श्रीमान् प्रेम करील आणि मग ...... मरतांना "प्रिय नोराला माझे सगळे पैसे ताबडतोब मिळावें" असें मृत्यूपत्रांत लिहून ठेवील तर! नोराच्या प्रत्येक विचारांत व शब्दांत जगाच्या कटु सत्याविषयीं तिचें केविलवाणें अज्ञान व कसल्याही अमंगलाची शंका सुद्धां न वाटतां अत्यंत निर्व्याज मनोवृत्तीनें विचार करण्याची व वागण्याची तिची आयुष्याची तऱ्हा पाहिली कीं, या मायावी जगांत तिचे किती भयंकर हाल होणार आहेत अशी प्रथम परिचयांत धास्ती वाटते! जेथें पुरुषाविषयींच्या सहानुभूतीला सुद्धां 'व्यभिचार' म्हणतात तेथें पुरुषाकडून, उपासना करणाऱ्या माणसाकडून पतिभक्तीसाठीं कां होईना पैसे घेणारी नोरा किती अधम म्हणावी लागेल!

परंतु नोराची तपश्चर्या येथेंच संपणार नव्हती. मिसेस् लिंडजवळ आपली सर्व कथा तिनें सांगितली व तिच्यासाठीं हेल्मरकडून एक जागा मिळवून देण्याचें कबूल केलें, तोंच मि. क्रॉगस्टॅड हा तिचा सावकार तिच्या दाराशीं आला! वास्तविक त्या दिवशीं पहिली तारीख नव्हती, हप्ता देण्याचा दिवसही नव्हता. असें असतांना क्रॉगस्टॅड आलेला पाहून नोराला धास्तीच वाटली. बँकेंत जागा देण्यासाठीं क्रॉगस्टॅडनें नोराला विनंति ............ विनंति म्हणण्यापेक्षां सावकारशाहीच्या जोरावर—हुकूमच केला. मिसेस् लिंडला जागा दिल्यानंतर मि. क्रॉगस्टॅडला रजा देण्याचा

बराचसा संभव होता. व अशावेळीं नोरावर आपण केलेल्या उपकाराचा उपयोग करून घ्यावा असा मि. क्रॉगस्टॅडचा डाव होता. क्रॉगस्टॅडची ही बळजबरी पाहून नोराची अत्यंत केविलवाणी स्थिति झाली. आणखी एकच हप्ता देऊन आपण याच्या कर्जातून मुक्त होऊं म्हणून प्रथम तिनें क्रॉगस्टॅडला जरा धमकावूनच पाहिलें. परतु नोराला जाळ्यांत अडकविण्यासाठीं क्रॉगस्टॅडनें पुरेपुर तयारी केली होती. स्वतःच्या जीवनाचा प्रश्न आल्यामुळें व नोराच फक्त आपली जागा टिकविण्यास समर्थ असल्यानें क्रॉगस्टॅडनें नोराला भाग पाडण्यासाठीं वाटेल तें बरें वाईट कृत्य करण्याचें ठरविलें होतें. नोरानें वडिलांच्या नांवानें दिलेल्या क्रॉगस्टॅडला कर्जरोख्यावर स्वतःच वडिलांची बनावट सही केली होती, हेंही एक पातक नोरानें केलेलें क्रॉगस्टॅडला माहीत होतें. आणि या सर्व गोष्टी, हे गुप्त व्यवहार हेल्मरला सांगून नोराच्या आयुष्याचें मातेरें करणें क्रॉगस्टॅडला फारसें अशक्य नव्हतेंच ! क्रॉगस्टॅडनें नोराच्या नाजुक परिस्थितीचा फायदा घेऊन तिचा जो छळ चालविला होता, त्यावेळेचें संभाषण गडकऱ्यांच्या प्रेम-संन्यासांतील खलपुरुष व नायिका लतिका यांच्या संभाषणासारखेंच आहे ! परंतु त्यांत फरक एवढाच कीं, नोरा अत्यंत निरपराधी आहे व तिनें सर्व पतिप्रेमानें प्रेरित होऊन केलें आहे ! आपल्या वडिलांना या भानगडी व आपल्या पतीची चिंताजनक प्रकृति कळूं नये म्हणून नोरानें वडिलांनाही ही गोष्ट न कळवितां त्यांच्या जामिनकीबद्दल स्वतःच बनावट सही केली होती. वडिलांची चिंता दूर करण्याकरितां व पतीचें आयुष्य वांचविण्याकरितां आपण हें केलें. त्याला कायद्यानें गुन्हा कां

म्हणावें हेंच त्या बिचारीला कळेना! कायदा हेतु लक्षांत घेत नाहीं, फक्त कृत्य लक्षांत घेतो हें क्रॉगस्टॅडनें तिला समजावून सांगितलें, त्यावेळीं तिच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला कीं, आपला सहाय्यकारी क्रॉगस्टॅड यानें आपणास पूर्णपणें पिंजऱ्यांत कोंडलें आहे! आपल्या पतीचे प्राण वांचविण्यासाठीं धडपड करण्याची पत्नीला परवानगी कां नसावी? कायद्याला माणसाच्या सद्धेतूची ओळख कां नसावी, हें नोराला कळेना. परंतु नुसत्या हेतूच्या पावित्र्यावर या मायावी जगांत टिकाव लागत नाहीं, हें नोराला आतां कळलें. क्रॉगस्टॅड हा थोडासा दुर्वर्तनी वगैरे असल्यानें हेल्मरसारख्या स्वाभिमानी माणसाला त्याच्याबरोबर काम करणें सहन होत नव्हतें व म्हणून क्रॉगस्टॅडला काढून टाकून मिसेस् लिंडला कामावर घेण्याचें हेल्मरनें ठरविलें होतें. परंतु हेल्मरकडून डच्चलेला क्रॉगस्टॅड हाच नोराचा उपकारकर्ता असल्यानें नोराला क्रॉगस्टॅडसाठींच हेल्मरची विनवणी करणें भाग होतें. असल्या नीच माणसासाठीं आपणास विनंति करणारी पत्नी पाहून स्वाभिमानी हेल्मर भयंकर चवताळून जातो! क्रॉगस्टॅडसारख्य नालायक इसमाची तरफदारी करण्याबद्दल त्याला नोराचा भयंकर तिरस्कार वाटतो. स्वाभिमान हें हेल्मरचें मर्म होतें. त्या मर्मस्थानीं आघात झालेला सहन करण्याची त्याला संवय नव्हती. नोरानें आपल्या न कळत क्रॉगस्टॅडच्या गुप्त भेटी घेतल्या, हेंही त्याला कळलें व नोरा विषयीं एक क्षणार्धांत त्याचें मन विटलें. नोरा ही कुलटा आहे असें त्यांस वाटलें. अशी पत्नि आपल्या मुलांचें मातृपद स्वीकारण्यास नालायक आहे हेंहि अप्रत्यक्षपणें नोराला सुचविण्यांत आलें होतें. क्रॉगस्टॅड हा किती बदमाष माणूस आहे हें हेल्मरनेंच

नोराला समजावून दिलें व सहाय्यासाठीं आपण एका सापाला हातीं धरलें, याबद्दल नोरा अत्यंत व्याकूळ झाली. हेल्मरनें नोराला सांगितलें. "नोरा ज्या माणसाबद्दल तूं मजजवळ शिफारस करतेस तो किती नीच आहे याची तुला जाणीव नाहीं. त्यानें स्वत: बनावट सह्या केल्या आहेत, आणि त्याहीपेक्षां भयंकर म्हणजे त्याचीं मुलें त्याच्या घराच्या अधमतेच्या वातावरणांत वावरून तींही दूषित होत आहेत. कारण असल्या दुर्वर्तनानें व्यापलेल्या वातावरणांत वावरणाऱ्या मुलावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. त्यांच्या प्रत्येक श्वासोच्छ्‌वासाबरोबर मुलें पातकी वृत्तींचा स्वीकार करीत असतात."

नोरा..."खरेंच का हें?"

हेल्मर..."होय, माझ्या वकिलीच्या आयुष्यांत आईबापांच्या पातकांनीं मुलेंही दूषित झाल्याचीं मी कितीतरी उदाहरणें पाहिलीं आहेत. प्रत्येक बदमाषाची आई बदमाष होती असें मला आढळून आलें आहे!"

या सिद्धांतावर नोराचा विश्वास बसतो. तिचें अपराधी मन तिला डचवूं लागतें व आपणही अशीं वाईट कामें केलीं, आपल्या सहवासानें आपलींही मुलें बिघडतील, म्हणून तिनें आपल्या मुलांना जवळच येऊं देण्याचें नाकारिलें! मुलांच्या सहवासासाठीं तिचें मातृहृदय तळमळत असतां वरील सिद्धांतामुळें तिचें मन मुलांना जवळ घ्यावयास दचकत होतें! मी भ्रष्ट झालें कां? माझें घर दूषित झालें कीं? माझी मुलें मला मुकलीं कां?" या विचारानें ती पांढरी फटफटीत पडली. हें असें खरेंच असेल कां असें तिला वाटे.

याप्रमाणें पहिल्या अंकाच्या आरंभीं हेल्मरच्या वक्ष:स्थलावर

मान टाकून आपल्या नूतन वैभवांत मग्न झालेली नोरा त्या अंकाच्या शेवटीं अशा कोलाहलांत सांपडली आहे. पतिभक्तीनें प्रेरित होऊनच तिनें फारसा विचार न करतां क्रॉगस्टॅडसारख्या अधम माणसाचेंही सहाय्य स्वीकारिलें! आपल्या पतीच्या स्वाभिमानाला दुखवू नये म्हणून तिनें पतीला याचा सुगावा लागूं दिला नाहीं. आपल्या वडिलांना मृत्यूसमयीं हा हृद्रोग नको म्हणूनच तिनें वडिलांच्या जामिनकीबद्दल बनावट सही केली. हें सर्व करीत असतां आपण आपल्या प्रिय हेल्मरला वांचवीत आहोंत हा एकच विचार तिला धीर देत होता. परंतु अजाण नोराला या सर्व आत्मसंतर्पणाचें प्रायश्चित्त अत्यंत विपरीत मिळूं पहात होतें! क्रॉगस्टॅडनें तिचा छळ सुरु केला होता. पुन्हां हेल्मरच्या जीवासाठीं सर्व करून आपल्या संकटांत हेल्मरचें सहाय्य मागणें तिला शक्य नव्हतें! पतिभक्तिसाठीं देहाची पर्वा न करणाऱ्या पत्नीला इतकें करूनही, आपल्या पतिभक्तिविषयीं कधींही विश्वासच वाटूं नये ही मैत्री कीं तह?

आपण नवऱ्यासाठीं केलेलें धाडस एक मोठें पाप ठरलें आहे असें नोराला कळून चुकलें होतें. दुष्कृत्यानें दूषित झालेल्या आईच्या सान्निध्यानें मुलें बिघडतात हें हेल्मरनें सांगितल्यापासून निदान मुलें तरी शुद्ध रहावींत म्हणून नोरानें मुलांना दूर लोटलें होतें! तिचें अंतःकरण मुलांसाठीं तळमळत होतें. ती नर्सला येतां जातां कळवळून विचारते, "मुलं माझी आठवण करतात कां ग? पण मला आतां त्यांच्याजवळ जातां येणार नाहीं, आणि कधींच त्यांच्याजवळ गेलें नाहीं तर तीं आईला विसरतात कां? आईलासुद्धां विसरतात ना? तूंच आतां त्या मुलांची आई हो ना?" वगैरे शब्दांत तिचें व्याकुळ अंतःकरण व्यक्त होत आहे. जगाच्या

दृष्टीनें तिनें दोनतीन अपराध केलें आहेत.एक स्वतःच्या जबाबदारीवर नवऱ्याला वांचवण्याचें धाडस;दुसरें सत्य व परमेश्वर यांच्यावर अवास्तव विश्वास ठेवून क्रॉगस्टॅडसारख्या माणसाची मदत घेणें. पहिली चूक म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य,दुसरें पातक म्हणजे अनाचार.या सर्व पातकांचें प्रायश्चित्त म्हणजे हेल्मरकडून त्याग आणि मुलांची ताटातूट! आणि हें सर्व पतिभक्तिचें प्रायश्चित्त! भक्ति झाली म्हणून काय झालें! देवाची लहर सांभाळावयास पाहिजे! शंकराच्या डोक्यावर बेल व धोतऱ्याचें फूल वहावयाच्या ऐवजीं तुळसीपत्र व तांबडें फूल वाहिलें तर त्या भक्तीचा काय उपयोग?

परंतु अद्याप हेल्मरला आपल्या पत्नीच्या व्यक्तित्वाचा सुगावा लागला नव्हता. •अद्यापपर्यंत त्याला पाहिजे तो नेमका संवादी सूर त्याला मिळत होता. आपली पत्नी नोरा, म्हणजे एक आपण मिळविलेली हौशीची सुंदर वस्तु आहे व आपल्याला संतुष्ट करणें हाच त्या वस्तूचा उपयोग आहे, एवढीच हेल्मरची पत्नीविषयीं कल्पना होती व आपल्या मालकीमध्यें नोराला पूर्णपणें एकरूप करावयाचें अशी त्याची आवड होती. नोरानें आपल्याशिवाय कोणाशीं बोलतां कामा नये, कोणाशीं स्नेह करतां कामा नये, फार काय आपल्याजवळून हालतांसुद्धां कामा नये असा हेल्मरचा हट्ट होता. आपल्या आयुष्याचा हा विचार नोराला पहिल्यापहिल्यानें जाणवला नाहीं! आणि पुढें जाणवला तरी 'पति, म्हणून हेल्मरच्या हातीं असलेल्या सत्तेची तिला भीति वाटत होती!' थोडासा बेसूर झाल्याबरोबर केशवसुतांच्या सतारीसारखे हेल्मरनें नोराचे तुकडे तुकडे करून टाकले असते!

परंतु या बेदरकार वागणुकीबद्दल हेल्मरलाही दोष देतां येत

नाहीं. या नाटकांतील कोणचीहि व्यक्ति स्वभावानें दुष्ट नसतांना प्रत्येकाच्या हालचाली एकमेकांस तापदायक झाल्या आहेत. नोरा स्वभावानें कारस्थानी स्त्री नसतांना तिच्या हातून अन्यायाचीं कृत्यें झालीं आहेत. हेल्मरसुद्धां अशाच पेचांत सांपडला आहे. क्रॉगस्टॅड-सारख्या नीच माणसाचा आपल्या पत्नीनें आधार घ्यावा हें त्याला सहन झालें नाहीं ! पत्नीनें पतीच्या इच्छेचा अवमान करावा हें भयंकर पातक आहे अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. पत्नीच्या व्यक्तित्वाला कांहीं किंमत असते हें त्याला ठाऊकच नव्हतें. एका सुंदर वाद्यापेक्षां पत्नीला कांहीं आयुष्य असूं शकते याची त्याला जाणीव नव्हती. निरुपयोगी वस्तु तुकडे करून फेकून द्यावयाची तशीच नादान पत्नि, अशी त्याची तयारी होती. नोराला लाथाडतांना त्याला कांहींच वाटलें नाहीं ! त्यामुळें बाहेरचा 'काजी' हेल्मर, आपल्या पत्नीशीं इतका नीच कां होतो, अनुदार कां होतो याचें आप-णांस गूढ पडतें. समाजांत 'लाखांत एक' गणलीं जाणारीं भलीं माणसें आपल्याच पत्नीशींच बेजबादार व अमानुष कां असतात याचें आपणास आश्चर्य वाटतें व स्त्री जातीवर अन्याय होत आहे ही ओरड आपणांस एकांगीं वाटूं लागते ! याचें कारण युगानुयुगा-पासून झालेले ते संस्कार आहेत. धार्मिक विधींतल्या कवायती पलीकडे त्या विवाहाच्या धर्मग्रंथप्रणित उज्वल स्वरूपाशीं आमचा परिचय झाला नाहीं ! बायकांना बाहुल्यासारखें वागविण्यांत आम्ही अन्याय करतों असें आम्हांस वाटतच नाहीं. त्यामुळें एखाद्या जादूनें भारल्याप्रमाणें प्रकृतिगुणानें सत्वप्रधान असलेलीं माणसें आपल्या पतित्वाचे ठिकाणीं तामसी होतात ! हेल्मरविषयीं आपणास तिरस्कार वाटत नाहीं. कारण तो स्वभावानें दुष्ट नाहीं. सुधाकरानें दारुच्या

धुंदींत सिंधूचें अनन्वित हाल केले तरी सुधाकराविषयीं कींव येतें; पण तिरस्कार वाटत नाहीं. सुधाकरासारखींच आपल्या पौरुषाच्या दारुची धुंद हेल्मरच्या वर्गाला आलेली असतें. इब्सेननें 'घोस्ट' या नाटकांत म्हटल्याप्रमाणें रूढींचीं हीं भुतें आपल्या मानगुटीस बसलेलीं असतात हेंच खरें !

स्वभावानें पापभीरु असा मॅकबेथ राज्यलोभाच्या धुंदीनें लागोपाठ खून करितो, कारण त्याची विवेकबुद्धी चिरडलेली असते. पुरुषवर्गानें स्त्रियांशीं वागतांना अशाच धुंदीनें, विचार न करण्याची स्वतःस संवय लावून घेतली आहे. नाहीं तर स्त्री व पुरुष या समान विभागाचें अहीनकुलवत् नातें असावें असा कांहीं नियंत्याचा हेतु दिसत नाहीं. अन्यायाची जाणीवहि न होण्याइतकी आपली वृत्ति या रूढ वळणावर रुळली आहे. त्यामुळें स्त्रियांमधील व्यक्तित्वाचा उदय हें आपणास धूमकेतूसारखें अशुभ वाटतें ! या नाटकांतील हेल्मरची भूमिका अगदीं अशीच आहे. अजाणपणानें क्रॉगस्टॉडसारख्या नीच माणसाची मदत घेऊन त्याचें ऋण पत्करून नोरानें हेल्मरची इभ्रत धोक्यांत घातली होती, परंतु यालासुद्धां हेल्मरच जबाबदार नाहीं काय ? 'आपण नोराचे खरे मित्र आहोंत' असा विश्वास हेल्मरनें नोराच्या मनांत कधींच उत्पन्न केला नाहीं; त्यामुळें नोराला हेल्मरविषयीं कधींच मित्रासारखा विश्वास वाटला नाहीं. एका चांगल्या प्रेमळ धन्यापलीकडे नोराला हेल्मरविषयीं निराळें कांहींही वाटत नव्हतें. नाहींतर नोराला हेल्मरचें सहाय्य मिळालें असतें आणि नोराला इतकें धाडस करण्याची जरूरच उरली नसती.

हेल्मरची पति या भूमिकेवरची, सद्धर्माची नालायकीच पर्यायानें त्याच्या पत्नीच्या हातून प्रमाद घडण्यास व स्वतःची इभ्रत कलं-

कित होण्यास कारणीभूत झाली आहे. क्रॉगस्टॅडनें आपल्या अपमानाचा सूड म्हणून नोराला व हेल्मरला धुळीला मिळवण्याचा निश्चय केला होता! क्रॉगस्टॅडसारख्या अधम माणसास आपल्या घरांत वाव द्यावयासुद्धां हेल्मरची आपल्या पत्नीच्या सुखदुःखाविषयींची बेदरकार वृत्तीच कारण आहे! हेल्मरच्या स्वभावचरित्राच्या द्वारें पुरुषवर्गाच्या बेजबाबदार आत्मनिष्ठवृत्तीनें अनर्थपरंपरा कशी उत्पन्न होते हें इब्सेननें उत्तम प्रकारें दाखविलें आहे. पुरुषवर्गाच्या 'आत्मैव' वृत्तीनें स्त्रीवर्गाचें तर सर्वथैव अधःपतन ओढवलेंच, पण पुरुष वर्गाला स्वतःलासुद्धां सुख मिळवितां आलें नाहीं हें आतां दिसून येत चाललें आहे! इब्सेननें या सूचना किती तरी आगाऊ दिल्या होत्या.

हेल्मरवर सूड उगवण्याकरतां नोराशीं आपला झालेला व्यवहार सांगण्यासाठीं क्रॉगस्टॅडनें, हेल्मरला लिहिलेलें सविस्तर पत्र नोराला आपल्या पत्राच्या पेटींत दिसलें. त्याचवेळीं तिला आपलें या घरांतील आयुष्य संपलें याची जाणीव झाली. आणि मिसेस् लिंडला आपल्या घरांत घेण्याची विनंति करून घराचा संन्यास करण्याची मनाची तयारी तिनें चालविली होती. तें पत्र हेल्मरनें पत्राच्या पेटींतून काढलें आणि तें घेऊन तो आपल्या खोलींत वांचण्यासाठीं गेला. नोरानें हेल्मरला शेवटचा 'Goodnight' करून आपल्या खोलीचा रस्ता धरला. आपण हेल्मरसाठींच एवढें धाडस केलें परंतु आतां यावेळीं हेल्मर मात्र आपल्या पाठीशीं उभा रहाणार नाहीं हें तिला माहीत होतें. मुलांबाळांसह घरदार सोडण्याची, जिवंतपणीं जीवन्मृताची दीक्षा घेण्याची घटका जवळ आली होती. नोरा आपल्या खोलींत आल्याबरोबर घराबाहेर

निघून जाण्याची तयारी करूं लागली. इतक्यांत हेल्मर तें पत्र हातांत घेऊन नोरापुढें येऊन उभा राहिला.

" नोरा, या पत्रांत काय आहे तें तुला माहीत आहे ? "

" होय मला माहीत आहे ". " कोठें निघालीस तूं ? "

" हेल्मर, तूं माझें संरक्षण करूं शकणार नाहींस, हें मला माहीत आहे. जगांतील कोणत्याहि गोष्टीपेक्षां मी तुझ्यावर जास्त प्रेम केलें आहे. "

" बस्स झाले हे नादान शब्दप्रयोग ! गेल्या आठ वर्षे जी माझा आनंद आणि अभिमान यांचें स्थान होती ती लफंगी, खोटें बोलणारी, गुन्हेगार ठरावी ! तुझ्या बापाप्रमाणेंच तुझेंही वर्तन बेबंद आहे. तुला नीति नाही, धर्म नाहीं, कर्तव्याची ओळख नाहीं. " नोरा शांतपणें निर्विकार मनानें हें सर्व ऐकत होती. ती शांतपणें हेल्मरला म्हणाली.

" होय. हें सर्व असेंच आहे. "

हेल्मरच्या नजरेंत व्यक्तित्वाची ...... नवरेपणाची धुंद चढली होती. तो पुन्हां चिडून बोलूं लागला.

" नोरा, तूं माझ्या सर्व सुखाचा नाश केलास. माझ्या उज्वल भविष्याला काळिमा फासलास ! एका नादान अविचारी स्त्रीच्या नादीं लागून मी रसातळाला गेलों आहे. "

" मी दूर झालें म्हणजे तुमची वाट मोकळी होईल. "

" हीं गोड भाषणें आतां पुरी कर. तूं गेलीस तरी काय होणार आहे ? ती अंगावरची शाल काढून ठेव. तूं निघून जाणें म्हणजे लोकांच्या संशयास चेतना देण्यासारखें आहे. तुला येथेंच राहिलें पाहिजे. मात्र तुला मुलांजवळ जातां येणार नाहीं. माझ्या मुलांना

सांभाळण्याचें काम तुजवर सोंपविण्याइतका आतां मला विश्वास वाटत नाहीं. "

परंतु इतक्यांत क्रॉगस्टॅडकडून पश्चात्तापपूर्वक असें एक पत्र आलें आहे, व त्यानें तो बनावट सहीचा बॉंड नोराकडे परत पाठविला आहे. मिसेस् लिंडनें क्रॉगस्टॅडचें मन वळविलें होतें. तें पत्र व तो बॉंड फाडून टाकून हेल्मर सुखी झाला. सर्व संकटें टळलीं आणि पुन्हां आपण व आपणास खूष करण्यासाठीं जीव टाकणारी नोरा ...... हेल्मरचें दोन मिनिटांपूर्वीचें स्वरूप नोरा विसरली नव्हती. आपण स्वतःच्या सुखासाठीं या घरांत नसून हेल्मरच्या सुखासाठीं आहोंत; हेल्मरच्या सुखाला धक्का लागल्या-बरोबर हेल्मर अगदीं क्षणार्धांत आपला बळी घ्यायला कचरणार नाहीं हीं 'पतिहृदयाची' ओळख नोराला नुकतीच झाली होती. त्यामुळें सर्व संकट टळलें होतें तरी आपल्या कवडीमोल जीव-नाची तीव्र जाणीव नोरा विसरूं शकली नाहीं. हेल्मर पुन्हां बेहोष झाला. परंतु नोराचें सर्व मनोरथ ढांसळलेले होते. आपल्या पति-भक्तीची पाद्यपूजा पाहून तिच्या अंतःकरणाचे शतशः तुकडे झाले आहेत. 'विसर' म्हटल्याबरोबर ते हेल्मरचे शब्द विसरून जाण्याइतकी नोरा आतां अजाण राहिली नव्हती. हेल्मरनें पुन्हां 'माझ्या पांखरा! माझ्या फुला!' असें म्हणत नोराशीं प्रणय-विनोदास सुरवात केली. नोराला आपल्या आयुष्याचा हा उपहास पाहवला नाहीं. ती शांतपणें हेल्मरसमोर खोलींतून बाहेर पडली. हेल्मरचें ते गोड गोड स्नेहाळ शब्द वाचले कीं, 'एक क्षणा-पूर्वींच नोराला लाथाडणारा हाच तो हेल्मर कां' याविषयीं मन साशंक होतें. हेल्मर नोराचें सांत्वन करीत होता.

“ नोरा, तुझें संरक्षण करण्यासाठीं मी माझे विशाल पंख उभारलेले आहेत. मी तुला क्षमा केली आहे. मी तुला कधीं तरी टाकून बोलेन असें तुला वाटतें कां? पुरुषाच्या अंत:करणाच्या खऱ्या स्वरूपाची अजून तुला ओळखच नाहीं. आपल्या पत्नीला क्षमा करण्यांत पुरुषाला किती अननुभूत आनंद वाटतो म्हणून सांगूं? क्षमा केल्यानंतर माझी नोरा मला पत्नीसारखीच काय पण अगदीं मुलासारखी प्रिय आहे. पण हें काय? तूं अशी स्तब्ध उभी का?” नोरानें शांतपणानें उत्तर दिलें, “होय. हेल्मर, मी आतां पूर्वींची नोरा राहिलें नाहीं.”

“याचा अर्थ काय? इतक्या वर्षांनंतर माझी नोरा आतां कशी बदलणार? नाहीं, छे, शक्यच नाहीं. नोरा ......”

“हेल्मर, मला तुजजवळ पुष्कळ बोलावयाचें आहे. जरा खालीं बैस. तुला याचा अर्थ कळूं नये हें बरोबरच आहे. कारण आपण एकमेकांना कधींच पूर्णपणें ओळखलें नव्हतें. परंतु आतां ओळख पटल्यावर आपण या सगळ्याचा समारोप करूं या. आपल्या विवाहाला आठ वर्षें होऊन गेलीं, पण आज पहिल्या-नदांच तूं व मी, पति व पत्नी, इतक्या गंभीरपणें बोलत आहोंत. नाहीं कां? आज आठ वर्षांत आपण एकदांसुद्धां कळकळीनें एकमेकांचें अंत:करण मोकळें करणारा एकसुद्धा शब्द बोल-लेलों नाहीं.”

“पण तुला काळजी वाटूं नये म्हणूनच मी तुला कांहीं सांगत नव्हतों. माझ्या नोराच्या सुखासाठींच मी हें करीत नव्हतों कां? “नोराच्या या अनपेक्षित गांभीर्यानें हेल्मर हतबद्ध झाला होता.

" होय, माझ्या वडिलांनीं व नंतर तूं माझी सारखी फसवणूक केली आहे. "

" नोरा, जगांतल्या कोणत्याही वस्तूंपेक्षां मी तुझ्यावर जास्त प्रेम केलें आहे. "

" मुळींच नाहीं. माझ्यावर प्रेम करण्यांत तुला आनंद वाटत होता इतकेंच. त्यांत माझा कांहीं संबंध नव्हता. लहानपणीं बाबा मला, 'बाहुली' म्हणत असत. आणि मी माझ्या खेळांतल्या बाहुलीवर प्रेम करीत होतें तसेंच बाबा माझ्यावर प्रेम करीत होते. बाबांच्याविरुद्ध एक शब्दही बोलावयाची माझी प्राज्ञा नव्हती. बाबांच्याकडून मी तुझ्याकडे आलें. प्रत्येक गोष्ट तूं आपल्या आवडीप्रमाणें करीत होतास आणि तुझ्याप्रमाणें माझ्या आवडी-निवडी मला तयार कराव्या लागल्या. एकाद्या बाहुलीसारखें आतांपर्यंत माझें गेलेलें आयुष्य मी उलटून पाहिलें तेव्हां मला वाटूं लागलें कीं, एकाद्या अनाथ पोरक्या स्त्रीप्रमाणें माझें जीवन चाललें आहे. केवळ पोटाची खळगी भरण्यापलीकडे माझें येथें काहींही कार्य नाहीं. तुझ्या खुषीसाठीं नाना तऱ्हेच्या हालचाली करण्यासाठींच मी येथें जगत आहे. परंतु मी असेंच जगावें अशी तुझी इच्छा आणि बाबांचीहि अशीच इच्छा होती. माझ्या जीवनाच्या बाबतींत तूं आणि माझ्या बाबांनीं फार मोठें पातक, भयंकर प्रमाद केला आहे मी माझ्या स्वतःच्या आयुष्यासाठीं कांहींही करूं शकलें नाही, हा तुमचाच अपराध नाहीं का? मला आतां कळून चुकलें कीं, मला एक दिवसही या घरांत सुख मिळालें नाहीं; आजपर्यंत चाल-लेलें आयुष्य 'सुखाचें' आहे असें मला वाटत होतें; परंतु आज मला माझ्या आयुष्याचा अधःपात उमजला आहे. तूं मला एखाद्या

बाहुलीसारखें खेळवीत होतास. त्यांत या बाहुलीच्या सुखाचा कितीसा भाग होता ? हें तुझें घर, हें आपलें घर म्हणजे तुझी खेळायची जागा होती आणि ही आपली मुलें आणि मी तुझ्या हातांतलीं खेळणीं होतों. हाच आपल्या विवाहाचा अर्थ आहे ! "

" नोरा, आतां खेळायचे दिवस संपून मुलांचे अभ्यास करण्याचे दिवस आले आहेत ! "

" होय, मुलांच्या अभ्यासाचे दिवस आले आहेत. आणि माझ्याहि अभ्यासाचे दिवस आले आहेत. माझा आतां या मुलांशीं काय संबंध राहिला आहे ? मी अशी अपराधी स्त्री ! माझ्यावर मुलांची जोपासना सोपविणें हितकर नाहीं असें तूंच नाहीं का म्हणालास ? पत्नी म्हणून मला अस्तित्व नव्हतेंच आणि ' आई ' म्हणूनही माझें आतां अस्तित्व राहणार नाहीं ! मला माझ्या स्वतःच्याच आयुष्याचा अभ्यास करायला पाहिजे आणि म्हणूनच मी हें घर सोडणार आहे. अतां मला अडथळा करण्याचा किंवा परावृत्त करण्याचा कांहींही उपयोग नाहीं. लोक काय म्हणतील याचा विचार करण्याचें मला कांहींच प्रयोजन नाहीं. ज्याला ' पवित्र कर्तव्यें ' म्हणतात तीं आतां फक्त माझ्या स्वतःपुरतींच राहिलीं आहेत. ' पत्नी ' व ' माता ' या पोकळ शब्दांवर माझा विश्वास राहिला नाहीं. मी घरांतून बाहेर पडल्यावर लोक मलाच कर्तव्यभ्रष्ट म्हणतील, ही मला जाणीव आहे. स्वतःच्या आयुष्याचें खेळणें करून घेण्याचें मी नाकारलें, यालाच लोक ' दुराचार ' म्हणतील. तुझ्या कर्तव्यनिष्ठेबद्दल तुझी सर्वत्र वाहवा होईल. मोठमोठ्या पुस्तकांतून हीच जनरीति लिहिलेली आहे, नाहीं कां ? धर्मग्रंथांनीं पतिव्रता धर्माची अशीच व्याख्या केली आहे. परंतु मला धर्म म्हणजे काय हेंच

समजत नाहीं. माझ्या विवाहाच्या वेळेला धर्मविधि म्हणून धर्मगुरुनें जे मंत्र म्हटले त्याचाही अर्थ मला माहीत नाहीं. माझ्याकडून कोणच्या शपथा घेवविल्या, मी येथें कां आलें, कशी आलें या सर्व गोष्टींचा मला एकदां उलगडा करावयास पाहिजेच. तुला ते विचार एका स्त्रीच्या मुखांतून व्यक्त होतांना पाहून आश्चर्य वाटलें. खरेंच आहे ! स्त्रिया अद्याप कधीं बोलल्याच नाहींत. त्यांनीं कधीं कुरकूर केली नाहीं. बाहुल्या बोलूं लागल्या तें पाहून तुला विस्मय वाटेल. मी त्याला काय करणार; मी बाहुली नाहीं, मी जिवंत प्राणी आहे, हा काय माझा दोष आहे ! समाजाचे कायदे वगैरे सर्व मला वाटत होते त्यापेक्षां फार निराळे आहेत. आणि माझा त्यावर आतां विश्वासच बसत नाहीं. मी भ्रमांत आहे. बरळत आहे. माझें डोकें ठिकाणावर नाहीं असें का वाटतें तुला हेल्मर ? आजच्या इतकी स्पष्ट दृष्टी मला कधींच प्राप्त झाली नव्हती. मी अगदीं पूर्ण जागृत आहे. आणि जागी झाल्यावर कळलेलें हें नवें जग मला नीट पहावयास पाहिजे. तुला आश्चर्य वाटेल, पण स्पष्टच सांगतें कीं, मला असें कळून चुकलें आहे कीं......

'मी तुझ्यावर कधीं प्रेमही केलें नाहीं, माझ्यावर तूं मात्र माया करीत होतास, प्रेम करीत होतास; कारण तसें करण्यांत तुला सुख होतें. त्यांत माझ्या सुखाचा प्रश्नच नव्हता. आज या रात्रीं सर्व गोष्टींवर लख्ख प्रकाश पडला आहे. गेल्या आठ वर्षें मी शांतपणें सर्व पहात होतें. तूं माझ्याचसाठीं हें सर्व साहस केलेंस ना ? ठीक आहे. मी हें सर्व अंगावर घेतों, असे शब्द माझ्या पतीकडून निघतील......ही माझी अंधश्रद्धा एका क्षणांत मावळली आहे. पति पत्नीसाठीं नसतात, पत्नि मात्र पतीसाठींच असते हें तूं मला

पटवून दिसेस ! मी अशी वेडी आशा करावी हेंच मला माझें अज्ञान नाहीं का ?

" नोरा, तुझ्यासाठीं मी वाटेल तें करावयास तयार आहे. दिवस रात्र काबाडकष्ट करावें लागले तरी तुझ्यासाठीं करीन "

" पण हेल्मर, गेल्या हजारों वर्षे स्त्रियांनीं हें केलें आहे... गेल्या आठ वर्षे मी एका परक्या माणसाबरोबर येथें राहत होतें, या जाणिवेनें माझें अंतःकरण व्याकुळ होत आहे. आणि त्या 'पर' पुरुषाच्या इच्छेसाठींच मी तीन मुलांची ' आई ' झालें आहे ! परंतु हा परकेपणा कळल्यावर एक क्षणभरही या घरांत रहाणें शक्य नाहीं ! ठीक आहे हेल्मर ! भ्रष्ट झालेल्या आईचें मुलांना दर्शनसुद्धां नको ! या घरांतून निघून गेल्यानंतर मीं मात्र पोरकी होणार आहे ! ' कुलटा ' म्हणून जो तो माझा धिक्कार करील. ' बोलका ढलपा ' पाहून जो तो माझ्यावर शिव्याशापांचा वर्षाव करील. परंतु हेल्मर, जगानें तुझ्या सुखाची पुरेपूर तरतूद केली आहे. पत्नि घरांतून निघून गेल्यावर तुला पुन्हां हजारों बाहुल्या मिळतील आणि या नादान बाहूलीची तुला आठवणही होण्यांचें कारण नाहीं. माझ्याविषयींच्या कर्तव्यापासून मी तुला मोकळें करीत आहे. ती तुझी विवाहसूचक अंगठी परत घे झालें ? मला मदत करण्याचा प्रयत्न करूं नकोस. ' पर ' पुरुषापासून मी एक कपर्दिकही घेणार नाहीं. जगांत चमत्कारासारख्या कांहीं अद्भूत गोष्टी घडून येतात असें आतां मला यापुढें कधींही वाटणार नाहीं. आणि आपला विवाह हा तरी एक चमत्कार असावा अशी मला अपेक्षा उरली नाहीं !......"

नोरा घरांतून निघून जातांना पाहून हेल्मरची काय स्थिती झाली

आहे हें जाणण्याचें काम प्रेक्षकांवरच सोपवून इब्सेननें येथेंच नाटकाचा शेवट केला आहे !

नोराचें आयुष्य हें एका व्यक्तिपुरतेंच मर्यादित आहे असें नसून स्त्री–समाजाच्या आयुष्याचीं भूत, वर्तमान व भविष्यकालीन स्थित्यंतरें इब्सेननें त्यांत सूचित केलीं आहेत. स्त्री व पुरुष या समाजाचे संबंध व हक्कासंबंधाचे झगडे हिंदुस्थान व हिंदुस्थान सरकार यासारखेच आहेत असें म्हणतां येईल ! सलोख्याच्या कल्पनें-बरोबर पुरुषवर्गाला आपल्या स्वैराचाराला पायबंद बसण्याची जबरदस्त धास्ती वाटून ‘ अनाचार, ’ ‘ अधर्म, ’ ‘ अनीति ’ अशी ओरड स्त्रीवर्गाच्या प्रत्येक हालचालीबरोबर पुरुषवर्गाकडून करण्यांत आली आहे. याचें प्रत्यंतर हेल्मरच्या स्वभावचित्रांत येतें. हेल्मर व नोरा हीं आपापल्या वर्गाचीं प्रातिनिधिक स्वरुपें आहेत !

---

## वाइल्ड डक : : : ८

" The most foolish of all errors for clever young men is to believe that they forfeit their originality on recognising a truth which has already been recognised by others. "

*Geothe.*

रूढीची इभ्रत टिकवून धरण्यासाठीं रूढीच्या नांवानें असामान्य ध्येयाचे शेंदरी देव ( दगड ? ) समाजांत ठिकठिकाणीं कोपऱ्या कोपऱ्यावर बसवलेले असतात. व त्या देवाच्या नांवानें व कल्पित सामर्थ्याच्या भीतीनें रूढिदासांचे तांडे ' पापोऽहं पापोऽहं ' म्हणत घिरट्या घालीत असतात. ज्या ध्येयवादीपणाच्या नांवाखालीं

अनन्वित अनाचार समाज पचवीत असतो, त्या ध्येयवादीपणाचे वाभाडे इब्सेननें आपल्या सामाजिक नाटकांत कसे काढले आहेत हें मागील ३।४ लेखांकांत दाखविलेंच. 'वाइल्ड डक् (Wild Duck), याही नाटकांत असाच एक पोकळ ध्येयवादीपणाचा मासला दाखवला आहे. इब्सेनच्या तत्त्वज्ञानापुरताच त्या नाटकाचा उल्लेख येथें कर्तव्य आहे, म्हणून सर्व कथानकांतून फक्त कथासूत्र कायम ठेवणाऱ्या व्यक्तींचाच उल्लेख करतों. 'वाइल्ड डक' या नाटकांतील कुटुंब मिसेस ॲलविंगच्या घराच्या अगदीं उलट स्थितींतलें आहे. मुळांत 'थर्डक्लास' माणसें, परंतु कल्पनासाम्राज्यांत रंगून सर्वजण स्वतःला ध्येयनिष्ठ समजत आहेत. कुटुंबनायक हा अगदीं सामान्य किंमतीचा माणूस, परंतु आपला भविष्यकाळ अतिशय उज्वल आहे अशा महंमदी मनोराज्यांत रंगला आहे. आपली पत्नि सत्वप्रधान व पौराणिक पतिव्रता आहे, अशी त्याची खात्री असल्यानें 'सर्व शिष्टसंमत आहे' अशा समाधानांत तो रममाण झाला आहे. परंतु त्या पत्नीला मात्र या भोंवतालच्या दीड दमडीच्या पसाऱ्याची पुरेपुर जाणीव आहे. मिसेस् एकडल हिचा नवऱ्याच्या निराधार आशावादावर व भरमसाट आत्मविश्वासावर मुळींच विश्वास नसतो. परंतु त्याचबरोबर तिला त्याचा तिटकाराही वाटत नाहीं. 'चाललें तें ठीक आहे' अशा वृत्तीनें आपल्या समाधानाची तरतूद प्राप्त परिस्थितींत करणारी ती बाई होती आणि या जोडप्याचें कन्यारत्न मात्र आपल्या वडिलांच्या अननुभूत मोठेपणावर अंधश्रद्धा ठेवणारें होतें. त्या मुलीला वाटे, आपले वडील म्हणजे एक असामान्य व्यक्ति आहे व ते खरोखरच मोठे संशोधक होणार आहेत.

अशा रीतीनें तिला वाटणाऱ्या वडिलांविषयीच्या आदराची साब-णाच्या फेसाच्या फुग्याप्रमाणें अत्यंत काळजीपूर्वक जोपासना केली जात होती. वडील, मिस्टर एकडल स्वतःला त्या फुग्याचा मध्यवर्ति बिंदू कल्पित होते व ही सगळी गंमत पहात मिसेस् एकडल त्यांच्या-बरोबर जगत होती. मिसेस् एकडल पतिव्रता होती कीं नाहीं, याबद्दल मिस्टर एकडल यास कधींही शंका उद्भवली नाहीं. उलट पतिव्रता पत्नीच्या त्याच्या ध्येयास ती तंतोतंत उतरत असल्यामुळें मिसेस् एकडलनेंसुद्धां आपला आत्मपरिचय पतिराजांना करून देण्याची फाजील सत्यप्रीति दाखविली नाहीं. परतु वस्तुस्थिति अशी होती कीं, मिसेस् एकडल ही एक परित्यक्ता दुर्दैवी 'पत्नी' होती! आपली पत्नी ही एक टाकलेली स्त्री आहे हें न कळतां देखील मिस्टर एकडल याचें मिसेस् एकडलविषयीं कोणच्याही प्रकारचें असमाधान नव्हतें. व आपल्या पत्नीला त्यानें पतिव्रताधर्माचा शेंदूर फासून देव बन-वलें होतें! भूतकालांतील कांहीं अपरिहार्य प्रसंगांमुळें मिसेस् एकडलच्या वर्तमानकालावर कोणच्याही प्रकारचा काळिमा आला नव्हता. आणि तिला पुरेपुर जाणीव होती कीं, पुरुषांना विवाहा-पूर्वी जितकें आचारस्वातंत्र्य आहे, त्याच्या एकशतांशही स्त्रियांना नसल्यामुळें स्त्रीचें अपरिहार्य असेंही विवाहपूर्व आचारस्खलन पुरुषवर्गाला पचणार नाहीं. मिस्टर एकडल्ची पत्नि या नात्यानें करावयाचीं सर्व कर्तव्यें मिसेस् एकडल अत्यंत चोखपणें करीत होती आणि तिच्याकडून मिस्टर एकडल्ची पतिव्रताधर्माचीही व्याख्या अगदीं कांटेतोलपणें पाळली जात होती व एकंदरींत सर्व व्यवस्थित चाललें होतें.

परंतु मिसेस् एकडल्ला ज्या गृहस्थानें टाकून दिली होती,

त्या गृहस्थाचा मुलगा या कुटुंबाशीं दुर्दैवानें परिचित झाला. मिसेस् एकडल्ला पाहिल्याबरोबर आपल्या वडिलांनीं टाकलेली ही बाई येथें पत्नीपदावर आरूढ झालेली पाहून त्याची सत्यनिष्ठा व ध्येयप्रेम गुदमरू लागलें. मिस्टर एकड्लचें हें ध्येयनिष्ठ लग्न झालें नाहीं, ही त्या तरुणाला रुखरुख लागली. नवऱ्यानें टाकून दिलेली बाई मिस्टर एकड्लनें धर्मपत्नि म्हणून स्वीकारावी हें त्या तरुणाला सहन झालें नाहीं. मिसेस् एकडल् कितीही सद्गुणी असली, गृहकृत्यांत दक्ष असली, जिवापाड श्रम करीत असली, कोणच्याही धर्मपत्नींत व तिच्यांत कर्तव्यदक्षतेंत रेसभरही फरक नसला म्हणून काय झालें? तिला एका नवऱ्यानें—आपल्या वडिलानें—टाकली आहे, तेव्हां तिला पत्नीपदाचा मान मिळणें हा अनाचार आहे, मिस्टर एकड्लची ही फसवणूक आहे, सत्याचा अपलाप आहे, धर्माची हानि आहे असें त्या तरुणास वाटे. त्याचें मन त्याला स्वस्थ बसूं देईना. धर्मपत्नि म्हणजे जन्मल्याबरोबर, जन्मल्यापासून व जन्मभर मनानें, वाचेनें व कायेनें नियोजित वराचेच ठिकाणीं एकरूप व्हावयास पाहिजे, ही त्याची ध्येयवादी व्याख्या होती व केव्हां तरी मिस्टर एकडल्ला सर्व परिस्थिति सांगावी अशी तळमळ वाटून तो शेवटीं मिस्टर एकडल्ला एक दिवस सांगून टाकतो कीं, "मिसेस् एकडल् ही माझ्या वडिलांनीं टाकलेली स्त्री आहे." या एका सत्यान्वेषणाबरोबर मिस्टर एकडल्च्या सुखाचा सत्यानाश होतो. ही वस्तुस्थिति त्याला उघड्या डोळ्यानें पाहवत नाहीं. मिसेस् एकडल्च्या एकनिष्ठ सेवेचें फळ म्हणून तिला 'कुलटा' ही पदवी मिळते! आणि गरीब बिचारी ती मुलगी!! आपल्या

वडिलांच्या व घराण्याच्या इभ्रतीचा खोट्या कल्पनांवर उभारलेला मनोरा ढासळलेला न पाहवून ती आत्महत्या करून घेते! 'माझी आई कोणी तरी एकदां टाकून दिलेली स्त्री आहे', ही कल्पना तिला पचत नाहीं. 'आपली पत्नी पुनर्विवाहित आहे' हा धर्मनाश मिस्टर एकडल्ला पाहवत नाहीं. मिसेस् एकडल व मिस्टर एकडल् हीं सत्याचा अपलाप करून सत्यावर पांघरुण घालून जगताहेत हें ध्येयनिष्ठ लग्न नाहीं हें त्या तरुणास सहन होत नाहीं. आणि हे तिघे ध्येयवादी शेंदरी देवाचे भक्त, शेंदुराखालचा दगड पाहिल्याबरोबर घाबरून जाऊन त्या दगडावर डोकें फोडून जीव देतात!

या नाटकांत इब्सेननें एक गोष्ट प्रामुख्यानें सूचित केली आहे ती ही कीं, समाजांतील पुष्कळ व्यक्तींना सत्यापेक्षां सत्याचा अपलाप करण्यांत समाधान मानण्याची संवय असते. त्या गुंगींत ते समाधानानें जगतात. तेव्हां फाजील सत्यनिष्ठेनें त्यांच्यासमोर सत्याचा प्रकाश पाडून त्यांचे डोळे दिपविण्यानें कांहींच कल्याण साधत नाहीं. उदा० मिसेस् एकडल्चें पूर्वचरित्र माहीत करून घेण्याची तळमळ न बाळगतां तिला आपल्या स्वतःच्या पतिव्रताधर्माच्या गोंडस पोषाखांत बसवून मिस्टर एकडल् सुखानें जगत होता. तेव्हां त्याच्या सुखांत ही माती कालवणें अयोग्य आहे. तो तरुणसुद्धां असाच. व्यवहार व ध्येयवादीपणा यांची त्याच्या ठिकाणीं फारकत झालेली आहे. याशिवाय आणखी एक गोष्ट या नाटकांतून अप्रत्यक्षपणें सूचित झालेली आहे. स्त्रीवर विवाहपूर्व पावित्र्याचे घातलेले कडक निर्बंध कांहीं वेळेस कसे अव्यवहार्य ठरतात हेंही या नाटकांत दाखविलें आहे. थॉमस हार्डीनें आपल्या

'टेस' या कादंबरींत हेंच उत्कृष्ट प्रकारें दाखविलें आहे. त्या कादंबरींतील नायक टेसवर भक्तीच्या दर्जाचें प्रेम करतो. 'आपण एकमेकांचे वाटेल ते दोष पचवूं इतकें आपलें प्रेम अगाध आहे, समुद्रासारखें गंभीर आहे, त्यांत दोषांची वाळू कोठल्या कोठें गडप होईल व गांभीर्य अचल राहील,' असें तो आश्वासन देतो. आणि आपण आपल्या विवाहपूर्व आयुष्यांत केलेले अनाचार (?) तो मोठ्या मनमोकळेपणानें टेसला सांगतो. टेस हीहि गरीबीमुळें एका उमरावाच्या घरीं नोकरीस असतांना तिच्यावर त्या उमरावांच्या उल्लू चिरंजीवांकडून एका अतिप्रसंगाची बळजबरी होते. परंतु त्या नायकाचें–आपल्या प्रियकराचें–अनाचाराचें वृत्त ऐकून तिला विश्वास वाटूं लागतो कीं, यानें जाणून बुजून इतके ढंग केले. माझ्या हातून एकच अनाचार, तोही माझ्या असहाय स्थितीचा फायदा घेऊन झालेला आहे; तेव्हां मी जर याचे सर्व अनाचार सहन करून वजा करावयास तयार आहें तर माझ्या एका अपरिहार्य अनाचारास याच्या अगाध प्रेमांत कां जागा मिळणार नाहीं? 'आतां माझी हकीगत ऐक' असें टेस त्या नायकाला सांगते. परंतु 'आतां विवाहाचा धर्मविधि झाल्यावर आयुष्यभर आपण एकमेकांना सांगूंच.' असें म्हणून तो नायक टेसला तिचें पूर्वचरित्र सांगण्याची संधीच देत नाहीं. परंतु टेसला तळमळ वाटत असते. पुरुषांच्या अगाध प्रेमाच्या स्थैर्याचा तिला विश्वास वाटत नाहीं. विवाह होण्यापूर्वी सर्व सांगून मोकळें व्हावें असें तिला वाटत असतें, व शेवटीं आपल्या हकीगतीचें एक पत्र लिहून ती आपल्या नियोजित प्रियकराच्या खोलींत टाकते. तें पत्र वाचतांच प्रेमाच्या समुद्राच्या गांभीर्याचा क्षणार्धांत लोप

होतो. आपल्या विवाहपूर्व चारित्र्यांतील अनाचाराची कुमारकी मिरवणाऱ्या प्रियकराला टेसच्या एका अपरिहार्य अनाचाराची जाणीव बोचत राहते व तो तिचा त्याग करतो. बिचारे! टेसच्या अपेक्षेप्रमाणें पुरुषी हृदयाच्या पचनशक्तीची तिची अटकळ बरोबर ठरते. जरा वेळ संतापानें तिचें मन बधिर होतें, परंतु तरीसुद्धां आज ना उद्यां आपल्या एकनिष्ठ भक्तीची आपल्या प्रियकरास खात्री पटून तो परत येईल, या आशेवर ती अनन्वित सामाजिक छळवणूक सहन करीत दिवस काढते. बरोबर तेंच पुरुषी हृदय मिस्टर एकडलच्या बरगड्यांत आहे. व्यक्तींच्या चारित्र्यांतील सामाजिक कल्याणाच्या ध्येयाकडे दुर्लक्ष व्हावें किंवा हेटाळणी व्हावी असें इब्सेनही सांगत नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असें कोणचाही समाजशास्त्रज्ञ म्हणत नाहीं. प्रश्न एवढाच कीं, सामाजिक इभ्रत, कल्याण व स्वास्थ्य या नांवाखालीं व्यक्तीवर चारित्र्याचें नियंत्रण घालतांना तें सर्वांवर सारखेंच असावें. त्यांत पुरुष—आचारधर्म व स्त्री—आचार—धर्म अशीं राखीव व सोपीव खातीं कशाला?

परंतु वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, पुरुषवर्गाचें हें ध्येयाचें वेड व्यवहाराच्या खडकावर फुटून कधींच छिन्न भिन्न झालें आहे. असें असतांना पदच्युत झाल्यावरही संन्यासयोगाचे गोडवे गाण्याच्या प्रवृत्तीप्रमाणें मिसेस् एकडल् ही आहे तशी न स्वीकारतां, तिच्या सद्‌गुणांचा, एकनिष्ठेचा, वास्तवस्वरूपांत स्वीकार न करतां, तिला मारून मुटकून अव्यवहार्य ध्येयवादाच्या कोंदणांत बसविण्याच्या अट्टाहासानें तें कोंदण फुटल्याबरोबर मिस्टर एकडल्‌ची ‘इदं च नास्ति परं न लभ्यते’ अशी स्थिति झाली आहे.

कारण ‘ इदं ’ हेंच सत्य होतें. ‘ परं ’ ही केवळ एक गोड कल्पना होती. वैवाहिक नीतीच्या रूढ कल्पनांचा व्यावहारिक हिणकसपणा सौ. इंदिराबाई सहस्रबुद्धे यांनीं आपल्या बाळूताईला लिहिलेल्या पत्रांत उत्कृष्टपणें दाखवला आहे. आणि शरीरसंबंधापुरतेंच टिकलेलें वैवाहिक बंधन हा मर्यादित व्यभिचार राजरोसपणें कसा चालला आहे हें त्यांतील नायिकेच्या हकीगतीवरूनही दिसतें. वरील कादंबरींतील एकही पात्र ‘ खल ’ नसतांना सर्वांच्या सुखाचा विध्वंस झाला आहे. तो अव्यवहार्य ध्येयवादाच्या वेडानेंच ! कोणाचाही हेतुपुरस्सर दोष नसतांना रूढ कल्पनांच्या भुतांनीं ( Ghosts ! ) कांहीं पात्रें पछाडल्यानें नायक व नायिका हीं त्यांच्या अहेतुक छळास बळी पडलीं आहेत. मिस्टर एकडल्-प्रमाणें त्या कादंबरींतील तात्यासाहेबांना आपल्या पत्नीचा भास्क-रशीं लहानपणापासून परिचय आहे हें सत्य पचलें नाहीं व शेवटीं ही आपली फसवणूक करण्याबद्दल त्यांनीं आपल्या पत्नीच्या वडिलांना जसा दोष दिला आहे त्याचप्रमाणें मिस्टर एकडल्नें आपली ध्येयभक्तीची गुंगी मोडल्याबद्दल त्या तरुणास चिडून दोष दिला आहे ! शरीर वाढल्यावर लहानपणचे कपडे कितीही प्रिय असले तरी ते बळेंच अंगावर चढवूं लागल्यावर तटातट् फाटतातच !! समाजाच्या विस्ताराबरोबर आचारधर्मही व्यापक झाले नाहींत तर व्यक्तींचा कोंडमारा होतो व तो व्यक्तींना असह्य झाल्यावर नव्याची हौस म्हणून नव्हे तर गरज म्हणून स्वीकार करावा लागतो. त्यांत मिस्टर एकडल्सारख्या व्यक्तीच्या समाज-विभागावर आपापततः हल्ले होतात. परंतु त्यांत दोष कोणाचा ?

# लवकरच प्रसिद्ध होणार !

**उन्माद** :—

लेखक— प्रो. ना. सी. फडके.

●

**अभिलाषा** :—

कवि मनमोहन यांचें
चार वर्षांनंतरचें नवे पुस्तक.

●

**वादळी वारे** :—

लेखक—द. के. केळकर.

मनोहर ग्रंथ माला
१९६/८५ टिळक रोड
पुणें नं. २.

## मनोहर ग्रंथमालेचें

### सर्वांनीं एकमुखानें वाखाणलेले


# ‘ वाङ्मय-शोभा ’

## ( मासिक )

मनोहर ग्रंथ मालेंतून प्रसिद्ध होणाऱ्याच नव्हे तर मराठींतील इतरहि उत्तमोत्तम ग्रंथांचा परिचय मराठी वाचकांस करून देण्याच्या हेतूनें हे मासिक आम्ही सुरू केलें आहे.

ह्या मासिकांतील लयलूट, वाङ्मय–शोभा, आजकालचे साहित्यिक, विचार–विलास, प्रत्येक महिन्याचे टेबल वगैरे सदरें जितकीं अभिनव तितकींच लोकप्रिय आहेत. आक्टोबरपासून मासिकाचा आकारहि वाढविला आहे. शिवाय श्री. य. गो. जोशी, यांची “साहित्यिकांची सफर” घडाक्यानें सुरू झाली आहे. प्रो. पटवर्धन, प्रो. वा. म. जोशी, प्रो. द. के. केळकर, प्रो. निरंतर, प्रो. फडके यांच्या लेखांनीं हे मासिक आवडते होत आहे. ‘ संसार–सोपान ’चें मुखपृष्ठ चित्रित करणारे श्री. वसंत केळकर यांचे देखरेखीखालीं अंकाची सजावट केली जाते. आकार ‘ किर्लोस्कर ’ येवढा.

वा. व. ट. खर्चासह २ रुपये. किरकोळ अंकास ३ आणे.



REFBK-0005994